परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच "मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

वर्ष ८ । अंक २ । जून-जुलै २०१४

## मुखपृष्ठाविषयी

*मम्मांचा जन्म अमृतसर येथील एका सिंधी परिवारात सन १९१९ मध्ये झाला. पुढे वयाच्या १७व्या वर्षी (सन १९३६) त्या ईश्वरी ज्ञान-यज्ञात सर्मर्पित झाल्या. त्यांच्या अंगी असलेल्या दैवी गुणांमुळे पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांची नियुक्ती 'यज्ञमाता' या सर्वोच्च पदावर केली. सुरुवातीला यज्ञातील सुमारे ३५० कन्या व मातांना, मम्मांनी मातृवत स्नेह दिला व सर्वांची आध्यात्मिक उन्नती घडवून आणली. त्याचबरोबर सन १९३६ ते १९६५ या २९ वर्षांच्या अलौकिक जीवनात अतिशय तीव्र पुरुषार्थ करून, संपूर्ण कर्मातीत स्थिती प्राप्त केली. त्यामुळेच मम्मांचे जीवन प्रत्येक ब्रह्मावत्सासाठी अनुकरणीय आहे.*

*मातेश्वरी मम्मांच्या मस्तकावर शिवबाबांनी ज्ञान-अमृताचा कलश ठेवला होता. त्या ज्ञानाची धारणा त्यांनी प्रथम आपल्या जीवनात केली व नंतर दुसऱ्यांना ज्ञान देण्यासाठी त्या निमित्त बनल्या. त्यांच्या वाणीत मधुरता व संपूर्ण सत्यता होती. त्या साक्षात सरस्वती अर्थात ज्ञानस्वरूपा होत्या. हाच भाव मुखपृष्ठावर दर्शविण्यात आला आहे. २४ जून रोजी असलेल्या त्यांच्या ४९व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त, आम्हा सर्व ब्रह्मावत्सांची भावपूर्ण श्रद्धांजली!*

*-- प्रकाशक, अमृतकुंभ.*

**वार्षिक वर्गणी रु. ६०/-**
**अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/-**
**आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** www.amrutkumbh.com

## -- अंतरंग --


- माता सरस्वतींची महावाक्ये २
- अनुकरण करुया यज्ञमाता सरस्वतीचे (संपादकीय) ३
- शांती हा तव स्वधर्म आहे (कविता) ५
- ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता (भाग - १) ६
- सावर रे मना... ९
- अंतर्मुखता सकळ ज्ञानाचे सार (कविता) १०
- ज्वाला स्वरूप अमृतवेळा ११
- अनादि ड्राम्यावरील महाकाव्य १३
- सचित्र सेवावृत्त १५
- अलौकिक ब्राह्मण जीवनाचे कर्तव्य १९
- निर्विघ्न बनण्यासाठी लवलीन स्थितीत राहा २०
- हे विद्यादेवी माता सरस्वती, तुज नमो... २३
- हंससमान सदैव गुणमोती ग्रहण करा २६
- आत्म्याचे औषधशास्त्र २८
- पतंग उडवू चला... ३०
- श्रावण बाळासारखी माता-पित्याची सेवा... ३१
- समस्त आत्मे, व्हावे देवता (कविता) ३२


**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के.गोदावरी,
प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्,
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी.

संगणक अक्षरजुळणी : कु.मनिषा गोवळकर, ८ श्रीसदिच्छा सोसायटी, मीठ बंदर रोड, ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

# माता सरस्वतींची महावाक्ये
## (महिमा सारी त्या एकाची आहे)

**परमपिता, प्रभु ईश्वर, परमात्मा... जितकी ही महिमा आहे, ती त्या एकाचीच आहे. मनुष्य आत्मे अनेक आहेत, परम आत्मा, परमपिता एक आहे. म्हणूनच महिमा त्या एकाची आहे. त्याची जी महिमा आहे, ती कुठल्याही मनुष्याची केली जात नाही.** मनुष्याची महिमा भिन्न आहे, परमात्म्याची महिमा भिन्न आहे. संपूर्ण मनुष्य अर्थात देवी-देवतांची महिमा आहे, सर्वगुणसंपन्न, सोळा कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम, अहिंसा परमोधर्मी. परमात्म्याला सर्वगुण संपन्न म्हटले जात नाही कारण तो कधी अवगुणात येत नाही. जो अवगुणात येतो तोच सर्वगुण संपन्न बनतो तसेच सर्वगुण असणारा अवगुणात येतो. परंतु परमात्मा अवगुण व सर्वगुण यांच्या पलिकडे आहे. परमात्म्याची महिमा काय आहे? ज्ञानाचा सागर, ही महिमा कुठल्याही मनुष्याची नाही. परमात्म्याला म्हटले जाते, शांतीचा सागर, सुखाचा सागर, शांतीदाता, सुखदाता, दुःखहर्ता, सुखकर्ता. मनुष्याची महिमा आपण दुःखहर्ता, सुखकर्ता अशी करू शकणार नाही कारण मनुष्य आहे सुख व दुःखात येणारा, परंतु परमात्मा आहे दुःख दूर करून सुख देणारा. मनुष्य तर स्वतः दुःखात येतो मग तो दुःख हरणारा कसा असेल? त्यामुळे मनुष्याची महिमा भिन्न आहे आणि परमात्म्याची महिमा भिन्न आहे. त्यामुळे मनुष्य व परमात्मा यांची महिमा एकच समजणे अथवा आत्मा व परमात्म्याची महिमा एक समजणे, हे चुकीचे आहे.

कित्येक जण समजतात की आत्मा व परमात्मा एकच आहेत अथवा आत्मा, परमात्म्यामध्ये लीन होऊन जातो. जर आत्मा, परमात्म्यात लीन होऊन जातो तर काय परमात्मा, आत्म्यापासून बनतो? जर आत्मा, परमात्म्यात लीन होऊन परमात्मा बनतो तर काय आत्मादेखील परमात्म्यापासून बनला आहे? याचा अर्थ असा होतो की आत्म्याला परमात्मा व्हायचे आहे व नंतर परमात्म्याला आत्मा व्हायचे आहे. वास्तविक आत्मा कधीही परमात्मा बनत नाही व परमात्मा कधीही आत्मा बनत नाही. या सर्व गोष्टी यथार्थ समजून घेतल्या पाहिजेत. आत्मा भिन्न आहे व परमात्म्याचे कर्तव्य भिन्न आहे.

### ❐ प्रत्येक वस्तूच्या तीन अवस्था असतात

मनुष्य आत्म्याच्या सतो, रजो व तमो अशा तीन अवस्था असतात. परमात्मा मात्र या तीन अवस्थेतून जात नाही. परमात्मा सदैव सतो अर्थात सदा पावन आहे. सर्व गुण व शक्ती यामध्ये परमात्मा सदा स्थायी स्वरूपात आहे. परंतु आत्मा गोल्डन, सिल्व्हर, कॉपर व आयर्न अशा स्थितीतून जातो. आत्म्याच्या योग्यता भिन्न आहेत व परमात्म्याच्या योग्यता भिन्न आहेत. आत्मा कधीही परमात्म्यात लीन होत नाही तसेच परमात्मा आत्म्यात लीन होत नाही. त्यामुळे आत्म्याची जीवन कहाणी व परमात्म्याची जीवन कहाणी भिन्न आहे. जेव्हा आत्मा शरीरात प्रवेश करतो तेव्हा तो मनुष्य बनतो व त्याची जीवन कहाणी सुरू होते.

असे म्हटले जाते की सर्वात उत्तम मनुष्य जन्म आहे. उत्तम अर्थात शरीरही पवित्र तसेच आत्माही पवित्र. असे कोणते मनुष्य होते? जगाच्या इतिहासात असे कोणी मनुष्य होऊन गेले आहेत? आता तर तसे नाहीत ना? संन्यासींना पवित्र म्हटले जाते त्यांचा आत्मा थोडा फार पवित्र असेलही परंतु शरीर तर पवित्र नाही ना! कारण या समयी सर्वांचे शरीर विकारातून निर्माण होतात. शरीराला रोग होतो, दुःख होते. संन्यासींना देखील रोग-शोक होतो. यावरून सिद्ध होते की त्यांचे शरीरही पवित्र नाही. त्यांचाही कर्माचा हिशोब आहे ना! **परंतु असे उत्तम मनुष्य होऊन गेले ज्यांचे शरीरही पवित्र होते व आत्माही पवित्र होता, जे आज नाहीत, ते होते देवी-देवता. त्यांची महिमा आहे सदा स्वस्थ व सदा संपत्तीवान. ते कधी रोगी होत नव्हते, कधी अकाली मरत नव्हते, कधी अशांत-दुःखी होत नव्हते. ते संपूर्ण पवित्र होते म्हणून आजही मंदिरात त्यांच्या मूर्तींची पूजा केली जाते.** जर देवतासुद्धा अपवित्र असत्या तर त्यांच्या मूर्तींची पूजा का केली असती? ते देखील मनुष्यच होते

▶ पान क्र. ५ वर

संपादकीय..

# अनुकरण करुया यज्ञमाता सरस्वतीचे

कलियुगाच्या अंती संगमयुगात जेव्हा नवसृष्टीच्या स्थापनार्थ निराकार शिव परमात्म्याने, प्रजापिता ब्रह्माद्वारे ज्ञान-यज्ञ रचला तेव्हा सर्वप्रथम प्रजापिता ब्रह्मा यांनी त्या यज्ञात पाच विकारांची अथवा तन-मन-धनाची संपूर्ण आहुती दिली. त्यामुळे त्यांचा अलौकिक दिव्य जन्म झाला आणि ते यज्ञपिता बनले. त्यांचे अनुकरण करून अनेकानेक माता व कन्यांनी या ज्ञान-यज्ञात आपले सर्वस्व समर्पण केले. त्यांच्यात अग्रगण्य होत्या मातेश्वरी सरस्वती. त्यांचे सर्व संबंध, संस्कार व स्वभाव परिवर्तीत झाले. त्यांचाही अलौकिक दिव्य जन्म झाला आणि त्या यज्ञमाता बनल्या. याचेच प्रतीक म्हणून शास्त्रात ब्रह्माला सदैव वृद्ध दर्शविण्यात येते व सरस्वतीला युवावस्थेत दाखविण्यात येते. निराकार शिव परमात्म्याने, पावन सृष्टीच्या स्थापनार्थ एका वृद्ध, अनुभवी तनाचा (अर्थात प्रजापिता ब्रह्माबाबांचा) आधार घेतला. **परंतु बाल ब्रह्मचारिणी सरस्वतीने युवावस्थेतच ज्ञान-यज्ञात स्वतःला समर्पित केले आणि तीव्र पुरुषार्थाद्वारे वयाच्या ४६व्या वर्षी कर्मातीत बनून त्या दिनांक २४ जून १९६५ रोजी अव्यक्त झाल्या. त्यामुळे त्यांची यादगार नेहमी युवावस्थेतच दर्शविली जाते.** यावर्षी मातेश्वरींचा ४९ वा स्मृतीदिवस आहे. त्यानिमित्ताने आपण त्यांच्या दिव्य स्मृतींना उजाळा देऊ या व त्यांचे अनुकरण करून त्यांच्यासारखी कर्मातीत स्थिती प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करूया.

### ❒ मातेश्वरी ईश्वरी कार्यात संपूर्ण सहयोगी

सत्ययुगी सृष्टी स्थापनेच्या ईश्वरी कार्यात मातेश्वरी संपूर्ण सहयोगी व सर्वोत्तम सहाय्यक होत्या. त्यांनी अनेकानेक आत्म्यांना ईश्वरी ज्ञान प्रदान करून, शुद्रापासून ब्राह्मण बनविले. त्यांच्या या महान कार्यामुळेच स्वयं परमपिता शिवबाबांनी त्यांना ज्ञानदेवी सरस्वती हे उच्चतम पद दिले. त्यामुळे आजही भक्तिमार्गात सरस्वतीकडे लोक ज्ञानाची भिक्षा मागतात. तसेच मातेश्वरींनी योग अग्निद्वारे आपल्या विकर्मांचा विनाश केला होता. एवढंच नव्हे तर आपल्या अलौकिक योग शक्तीद्वारे अन्य आत्म्यांच्या विकर्मांचाही विनाश करून त्यांना पावन बनविले. सर्वांकडून विकारांचा बळी घेतला. म्हणूनच भक्तिमार्गात काली मातेच्या रूपात त्यांचे पूजन करण्यात येते. आध्यात्मिक पालनेच्या कार्यात तर त्या अद्वितीय होत्या. अनेकानेक आत्म्यांची त्यांनी दिव्य पालना केली. फलस्वरूप त्यांचे गायन जगदंबा (जगताची अम्बा) म्हणून करण्यात येते. मातेश्वरींमध्ये मुख्य दोन शक्ती होत्या, १) सामावून घेण्याची शक्ती, २) सहन करण्याची शक्ती. मातेश्वरी सर्वांचे अवगुण आपल्यात सामावून घेत व त्यांची अनुचित कार्ये सहन करून, त्यांच्याविषयी कल्याणाची भावना ठेवून, त्यांची आध्यात्मिक उन्नती करीत असत. मातेश्वरींच्या ईश्वरी पालनेत असीम शक्ती होती. त्यांची ही विविध रूपे लक्षात घेऊन, एका कवीने अतिशय सुंदर शब्दात त्यांचे वर्णन केले आहे,

**शक्तिरूपा, सिद्धीस्वरूपा, जगत्‌जननी अंबिका।**
**यज्ञमाता होऊनिया, पाळिले सर्व बालका॥**
**आरती तुझीच गाती, भक्तजन हे मंदिरी।**
**मातृमहिमा गावयाला, तोकडी मम वैखरी॥**

### ❒ तपस्वीमूर्त मातेश्वरी

मातेश्वरी तपस्येची जिवंत प्रतिमा होत्या. त्या नियमित-पणे सकाळी २ वाजता ब्राह्ममुहुर्तावर उठून परम प्रियतम परमात्म्याच्या आनंदमय स्मृतीत लवलीन स्थितीचा अनुभव करीत असत. दिवसभर आध्यात्मिक सेवा करताना त्या योगयुक्त रहात. स्वयं आत्म स्वरूपात स्थित राहून त्या सर्वांना अत्मिक स्वरूपात पहात असत. त्यांच्या योगयुक्त दृष्टीत अमोघ शक्ती होती जी अंतरंगात प्रवेश करून, मुर्च्छित आत्म्यांना जागृती प्रदान करीत असे. त्यांच्या हसण्या-बोलण्यात, खाण्या-पिण्यात, उठण्या-बसण्यात, प्रत्येक कर्मात अलौकिकता वा दिव्यता दिसून येत असे. त्याग, तपस्या, सेवा, दया, क्षमा, शांती, प्रेम हा त्यांचा सहज स्वभाव बनला होता. गुणसागर परमात्म्याशी त्या

सदैव कम्बाइण्ड (एकत्रित) असल्याने, मास्टर गुणसागर बनल्या होत्या.

**❒ मातेश्वरींवर सर्वजण प्रभावित व संतुष्ट**

मातेश्वरींची वाणी अतिशय ओजस्वी व मधुरता संपन्न होती. या ईश्वरीय विश्व-विद्यालयाचे विरोधक जेव्हा त्यांच्यासमोर येत तेव्हा ते नतमस्तक होत असत. मातेश्वरींचे वात्सल्य, त्यांची हर्षित व प्रसन्न मुद्रा, पवित्रता-पूर्ण व्यक्तित्व, त्यांच्या चेहऱ्यावरील दिव्य तेज, अगदी सहजपणे ज्ञान समजावून सांगण्याची त्यांची हातोटी या सर्व गोष्टींवर सर्वजण खूप प्रभावित होत असत. त्यांच्या मुखातून हेच उद्‌गार बाहेर पडत की, आम्ही तर आजवर ब्रह्माकुमारी संस्थेविषयी अनेक आक्षेप ऐकत होतो. परंतु मातेश्वरींच्या जीवनाची एक झलक पाहून आम्हाला अतिशय प्रसन्नता प्राप्त झाली. आमचे जीवन खरोखर धन्य झाले. मातेश्वरींना पाहून असे वाटले की त्या खरोखर आमच्या अलौकिक माता आहेत. कोणी म्हणत, 'मला असा आभास होत आहे की ज्या देवीचा मी भक्त आहे; ती वैष्णो देवी या सृष्टीवर अवतरित झाली आहे.' **तेव्हा मातेश्वरी त्यांना समजावून सांगत, 'होय मुलांनो, आता आपण सर्वजण भेटलो आहोत, आपण सर्व देवी-देवता घराण्याचेच आहोत. परंतु आपण स्वतःला विसरलो होतो व आपल्या कर्माच्या खात्यानुसार कोणी कुठे तर कोणी कुठे पार्ट बजावित आहोत. आता आपल्याला शिवबाबांनी अवतरित होऊन आत्म्याच्या ८४ जन्मांची कहाणी समजावून सांगितली आहे. त्यामुळे वर्तमान संगमयुगाचा समय हा अतींद्रिय सुखप्राप्तीचा, ज्ञान-योगाद्वारे प्रभुमिलनाचा व पवित्रतेचे खरे सुख प्राप्त करण्याचा आहे.'** मातेश्वरींचे हे वरदानी बोल श्रोत्यांच्या हृदयाला जाऊन भिडत. फलस्वरूप त्यांना पुरुषार्थाची प्रेरणा प्राप्त होत असे. मातेश्वरींचे प्रभावशाली व्यक्तित्व अनेक आत्म्यांना ईश्वरी ज्ञानमार्गाकडे आकर्षित करण्यासाठी निमित्त बनले.

**❒ मातेश्वरी शिवशक्ती सेनेच्या सेनानी**

मातेश्वरी शिवशक्ती सेनेच्या सेनानी होत्या. त्यांच्या आसपासचे वातावरण आध्यात्मिक शक्तीने ओतप्रोत असे. त्यांनी अतींद्रिय सुखाचा अनुभव पूर्णपणे घेतला होता. त्या अव्यक्त स्थितीत राहून परमात्म्याशी अव्यक्त मीलनाचा अनुभव करीत. फलस्वरूप त्यांच्या नेत्रात व मुखमंडलावर दिव्यता व अलौकिकता स्पष्ट अनुभवाला येत असे. त्या साकार सृष्टीवर रहात असूनही त्यांची बुद्धी निरंतर शिवलोक (शांतीधाम) व देवलोकात (सुखधाम) विचरण करीत असे. त्यामुळे असे प्रतीत होत असे की त्या जणू देवलोकातून सृष्टीवर अवतरित झाल्या आहेत आणि या सृष्टीवरील लोकांच्या कल्याणार्थ कार्य करीत आहेत. त्या पुराण्या संसाराविषयी संपूर्ण अनासक्त होत्या. त्यांचे जीवन कमलपुष्पसमान होते. म्हणूनच भक्तिमार्गात सरस्वतीचे आसन कमलपुष्प दर्शविण्यात येते. आपणही त्यांच्यासारखे कमलपुष्पसमान अनासक्त जीवन बनवू या.

**❒ मातेश्वरी विनम्रतेची साक्षात प्रतिमा**

मातेश्वरींची विनम्रता सध्याच्या युगात अकल्पनीय आहे. त्या विनम्रतेची साक्षात प्रतिमा होत्या. एवढ्या मोठ्या ज्ञान-यज्ञाच्या त्या मुख्य प्रशासिका असूनही त्यांना अहंकाराचा स्पर्शसुद्धा कधी झाला नाही. त्यावेळी देखील यज्ञात सर्वप्रकारच्या स्वभाव-संस्कारांचे लोक होते. त्यांनी अनेक प्रकारे मातेश्वरींशी सामना केला. परंतु त्यांच्यात कधीही बदला घेण्याची भावना उत्पन्न झाली नाही. त्यांनी सदैव सर्वांच्या कल्याणाची वृत्ती बाळगली. कधी कुणाला दुःख दिले नाही. तसेच कुणाकडून दुःख घेतले नाही. सर्वांविषयी त्यांच्या हृदयात अपार करुणा व प्रेमाची भावना होती. त्या साक्षी द्रष्टा बनून दुसऱ्यांचे तमोगुणी स्वभाव-संस्कार पहात असत. अपकारी आत्म्यावर देखील उपकाराची भावना ठेवीत असत. कमजोर आत्म्यांची कमजोरी न पहाता, त्यांना देखील आत्मिक शक्ती प्रदान करण्याचा प्रयत्न करीत असत. ड्रामावर त्यांचा अतूट निश्चय होता. कुठल्याही बाबतीत त्यांनी का, कसे इत्यादी प्रश्न विचारले नाहीत. या अनादि निश्चित सृष्टिनाटकात जे काही नोंदलेले आहे ते आपल्या कल्याणासाठीच आहे, असा त्यांचा दृढ विश्वास होता.

**❒ मातेश्वरी संपूर्ण निश्चयबुद्धी**

मातेश्वरी संपूर्ण निश्चयबुद्धी होत्या. ईश्वरी कार्यात त्यांना कधीही संशय उत्पन्न झाला नाही. ज्ञान-यज्ञात

अनेक कठीण परीक्षा आल्या परंतु त्या सदैव अचल, अडोल व निश्चिंत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावर कुठल्याही प्रकारची चिंता दिसली नाही. त्यांचा हा ठाम निश्चय होता की ईश्वरी कार्य कधीही असफल होणार नाही. सत्याची नौका हालेल-डुलेल परंतु बुडणार कधीच नाही, हा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे पिताश्री ब्रह्माबाबांनी मातेश्वरींना कितीही जरी कठीण कार्य करण्यासाठी आदेश दिले तरी त्यांनी कधीही प्रतिवाद केला नाही की हे कार्य कसे होईल? त्यांचे सदैव एकच उत्तर असे 'जी बाबा'. मातेश्वरी सफलतामूर्त होत्या. त्या जेही कार्य करीत ते हमखास सफल होत असे. म्हणून गायन केले जाते 'निश्चयबुद्धी विजयन्ति'.

**अशा सर्व सिद्धीस्वरूपा, पवित्रतेची पावनमूर्ती, ज्ञान-स्वरूपा, यज्ञमाता सरस्वतींना त्यांच्या ४९ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त आम्हा सर्वांचे कोटी-कोटी प्रणाम!**

-- ***ब्रह्माकुमार शिवाजी.***

---

▶ पान क्र. २ वरून

त्यांची पूजा केली जाते परंतु आपली पूजा का होत नाही? आपण त्यांना का पूजतो? ते आहेत पूज्य आपण आहोत पुजारी. असे अंतर का आहे? कारण त्यांचा आत्मा पवित्र होता व शरीरही पवित्र होते म्हणून ते पूजले जातात.

**❒ मनुष्यच उच्च होता, आता मनुष्यच नीच बनला आहे**

ज्ञानसागर शिवबाबा सांगतात की मनुष्य उच्च होता, आता त्याची स्थिती खालावली आहे. आता आत्माही अपवित्र तसेच शरीरही अपवित्र असल्याने त्याचे पद कमी झाले आहे. संगमयुगात शिवबाबा अवतरित होऊन, आत्म्याला पवित्र बनवितात. जेव्हा आपण स्वर्गात जातो तेव्हा आपल्याला शरीरदेखील पवित्र मिळते. फलस्वरूप आपले पद उच्च होते. आता शिवबाबा पवित्रतेचे कलम लावत आहेत ज्यातून पवित्र आत्म्यांच्या पिढ्या चालत राहतील. शिवबाबा आता येऊन, स्वतःची तसेच मनुष्यांची जीवन कहाणी सांगत आहे. त्यात मुख्य म्हणजे ब्रह्मा कोण, विष्णु कोण, शंकर कोण, राम-कृष्ण, लक्ष्मी-नारायण आदी सर्वांची जीवन कहाणी सांगत आहेत. लक्ष्मी-नारायण इतके उच्च बनले अर्थात मागील जन्मात त्यांनी इतके उच्च कर्म केले असतील ना! जरूर असा पुरुषार्थ केला असेल. लक्ष्मी-नारायण हे सत्ययुगातील महाराणी व महाराजा आहेत. त्यांनी जरूर कलियुगाच्या अंती पुरुषार्थ करून आपल्या कर्मांना इतके उच्च बनविले असेल. नंतर त्यांनी जन्म घेतला, तेव्हापासून सत्ययुगाचा प्रारंभ झाला. त्यालाच स्वर्णिम युग वा स्वर्ग म्हटले जाते. आता कलियुगाचा अंतिम समय आहे व आपण पुरुषार्थ करीत आहोत.

**❒ नवीन दुनिया स्थापन करणाऱ्यालाच परमात्मा म्हटले जाते**

सत्ययुगात होत्या १६ कला, त्रेतायुगात होत्या १४ कला नंतर कला कमी होत गेल्या. आता कुठलीच कला शिल्लक नाही. या सर्व गोष्टी शिवबाबा समजावून सांगतात. श्रीलक्ष्मी व श्रीनारायणाची जीवनकहाणी देखील ते समजावून सांगतात. त्याचबरोबर इब्राहिम, बुद्ध, क्राइस्ट आदी धर्म-स्थापकांची जीवनकहाणी सांगतात. कोणताही धर्मस्थापक हा नवीन दुनियेची स्थापना करण्यासाठी येत नाही. तो फक्त आपला धर्म स्थापन करण्यासाठी येतो. जसे क्राइस्टने येऊन नविन धर्म स्थापन केला, क्रिश्चियन धर्म. बुद्धाने येऊन आपला नवीन धर्म स्थापन केला, जो पूर्वी नव्हता.

**परमात्म्याला मात्र धर्मस्थापक न म्हणता, नवीन दुनियेचा स्थापक म्हटले जाते. तोच नवीन दुनियेची स्थापना करतो. बाकी दुसऱ्या धर्मस्थापकांना पैगंबर, मेसेंजर म्हटले जाते. ते फक्त आपल्या वेळेवर येऊन आपला धर्म स्थापन करतात. यावरून आपल्या लक्षात आले असेल की महिमा सारी एक परमात्मा शिव पित्याचीच आहे.**

***(संदर्भ : 'ज्ञान-झनकार' पुस्तक).***

---

# शांती हा तव स्वधर्म आहे

शांती हा तव स्वधर्म आहे, कधी जाणशील मनुजा तू हे? । ध्रु. ।
हिंदू, मुस्लिम, बौद्ध, इसाई, सकल धर्म हे देहा ठायी।
आत्मा तव हे, धर्मच नाही, देह नव्हे तू देही आहे।।१।।
देह तुझा हा केवळ साधन, यात वसे तू आत्मा चेतन।
शांती हे तर तव आभूषण, सदैव धारण करूनी राहे।।२।।
शांती ही तर तुझ्याच ठायी, तुझी वस्तू तू जाणत नाही।
तिला शोधतो दिशात दाही, वेड भ्रामक सोडून दे हे।।३।।

***(संदर्भः ब्र. कु. गौतम सुत्रावे रचित ज्ञानसुधा ही शिवबाबांची)***

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

(भाग -१)

*ब्र.कु.रमेश शाह, मुंबई (गावदेवी).*

ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर, शिवबाबांनी पहिली अव्यक्त मुरली, २१ जानेवारी १९६९ रोजी उच्चारण केली. त्यामध्ये ते म्हणाले की, या सृष्टीरंगमंचकावर ज्ञानसूर्य आणि ज्ञानचंद्रमाची रिमझिम आतापर्यंत चालू होती, परंतु शिव बाबा आता आपल्या मुलांच्या रूपातील ताऱ्यांची रिमझिम पाहू इच्छितात की, कोणत्या ताऱ्याची चमक सर्वांना किती आकर्षित करीत आहे. बाबा असेही म्हणाले की, या संगमयुगात मुलांनी कुठपर्यंत जबाबदारीचा मुकुट धारण केला आहे ते मी पाहू इच्छितो कारण या जबाबदारी-मुळेच तुम्ही सत्ययुगात विशेष मुकुटधारी बनणार असून त्याचा पाया आता यावेळी घेतलेली जबाबदारी आहे.

बापदादांनी दिलेली जबाबदारी किंवा आपल्या प्रति असलेल्या अपेक्षा आपण कशा पूर्ण करू शकू या संदर्भात मी हा लेख लिहिला असून पुढेही या विषयावर लेखमाला लिहिण्याचा विचार आहे. (वाचकांना याबाबत जर काही विचार द्यायचे असतील तर त्यांचे स्वागत आहे.)

प्रश्न असा पडतो की येथील आपली जबाबदारी काय आहे? जबाबदारीचा मुकुट काय प्रकार आहे? **आतापर्यंत आपली अशी कल्पना होती की, ज्ञानमार्गात फक्त चार विषय आहेत, ज्ञान, योग, धारणा व सेवा. आपलं ध्येय होत की या चार विषयांमध्ये 'पास विथ ऑनर' बनायचे आहे. परंतु या चार विषयांशिवाय जबाबदारी नामक पाचवा विषय कोणता आहे हे समजून घ्यावे लागेल.** जोपर्यंत या विषयाचे विश्लेषण करून समजून घेत नाही तोपर्यंत जबाबदारी उचलण्याचा पुरुषार्थ पण केला जाऊ शकणार नाही. कारण तोपर्यंत या चार विषयात संपूर्ण बनण्यानेच संपूर्णतेची स्थिती प्राप्त होईल असे समजले जाईल.

बापदादांनी सांगितले आहे की, जशी अवस्था, तशी व्यवस्था. त्यामुळे चार विषयांच्या आधारावर आपली मानसिक अवस्था परिपक्व बनू शकते व त्यामुळे आपल्याला श्रेष्ठ व्यवस्था करण्यासाठी शक्ती मिळत असते. व्यवस्था करण्यासाठी अनेक प्रकारच्या शक्तींची आवश्यकता असते आणि त्या अनुभवापोटी येत असतात. या चार विषयांच्या आधारे आपल्यामध्ये गुण व शक्ती विशेषता येतात. परंतु जोपर्यंत या चारही विषयात आपण परिपूर्ण बनत नाहीत तोपर्यंत आपली अवस्था देखील संपूर्ण बनू शकत नाही. बाहेरच्या दुनियेत राजा बनणाऱ्या राजकुमारांसाठी विशेष प्रशिक्षण दिले जात असते. जसे महाभारतातील पांडव-कौरवांना आदर्श शिक्षण देण्यासाठी एक विशेष स्थान तयार करण्यात आले होते व गुरु द्रोणाचार्य यांना विशेष आचार्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

महाभारतात असे लिहिले आहे की, एकदा कौरव-पांडव विटी-दांडू खेळत असताना विटी उंच उडून विहिरीमध्ये जाऊन पडली. सारे राजकुमार गोंधळात पडले की विटीला आता कसे बाहेर काढता येईल. तेव्हा तेथून एक ब्राह्मण रस्त्याने चालला होता. त्याने राजकुमारांना चिंताग्रस्त पाहून त्यांना विचारले की, तुम्ही इतके चिंतीत का आहात? तेव्हा त्यांनी सांगितले की त्यांची विटी विहिरीत जाऊन पडली आहे. त्यावर ब्राह्मणाने विहिरीत बाण चालविले ज्यामुळे त्याची रस्सी तयार झाली आणि शेवटी बाण त्या विटीला लागून ती विहिरीबाहेर आली. यामुळे राजकुमार खूप आनंदित झाले आणि त्यांनी ब्राह्मणाला आपल्या राज-महालात नेऊन आपले पितामह भिष्म यांच्याशी भेट करून दिली. भीष्म पितामह यांना समजले की त्या ब्राह्मणाने द्रोणाचार्यांचे गुरु परशुराम यांच्याकडून प्रशिक्षण घेतले आहे. तेव्हा भीष्म पितामह यांनी त्या ब्राह्मणाची राजगुरुच्या पदावर नेमणूक करून राजकुमारांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी सोपविली.

अशाप्रकारे, रामायणात ही वर्णन आहे की श्रीराम व श्रीलक्ष्मण यांना ऋषी विश्वामित्राने विशेष प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे जेव्हा त्यांच्या आश्रमावर राक्षसांनी हल्ला केला तेव्हा श्रीराम व श्रीलक्ष्मण यांना बोलाविण्यात आले

होते. त्यातील एक राक्षस मारीच होता, ज्याला श्रीरामाने घायाळ केले होते आणि तो आकाशमार्गे पळून गेला होता. कालांतराने जेव्हा सीतेचे हरण करण्याची रावणाला इच्छा झाली तेव्हा तो मारीच राक्षसाकडे गेला असता, मारीच म्हणाला की जेव्हापासून मी श्रीरामाकडून घायाळ झालो आहे, तेव्हापासून त्याचा बदला घेण्याचा विचार मी करीत आहे. आणि मग त्याने सोनेरी मृगाचे रूप धारण करून राम-लक्ष्मणाला आपल्या जाळ्यात अडकविले व अशाप्रकारे सीतेचे अपहरण झाले.

जेव्हा भारत स्वतंत्र नव्हता तेव्हा सौराष्ट्रामध्ये अनेक लहान-सहान राज्ये होती. त्या राज्यांच्या सर्व राजकुमारांना विशेष प्रशिक्षण दिले जात असे जेणेकरून भविष्यात ते चांगले व्यवस्थापक बनून राज्य चालवू शकतील. म्हणून इंग्रज सरकारने राजकोटमध्ये त्या राजकुमारांच्या प्रशिक्षणा-साठी एक कॉलेज उघडले होते, जेथे सर्व राजकुमार शिकण्या-साठी जात असत.

आपण सर्वांनी भूतकाळात अर्थात सत्ययुग-त्रेतायुगात राज्य केले आणि भविष्यामध्येही राज्य करणार आहोत. म्हणून आता आपल्या वर्तमान पुरुषार्थाच्या आधारावर समजावे की, भूतकाळात आपले काय पद होते व भविष्यात काय पद असू शकेल. श्रेष्ठ राज्य व्यवस्थेसाठी कोणत्या प्रकारच्या विशेषता धारण करणे आपल्याला गरजेचे आहे. **आपण असे म्हणू शकतो की आपले विश्व-विद्यालय होवनहार विश्व महाराजा-महाराणी बनण्याचे ट्रेनिंग देणारे म्हणजेच राजे-महाराजे निर्माण करण्याचे कॉलेज आहे. म्हणून आपल्याला प्रबंधन आणि नियोजन करण्याची शक्ती विकसित करावी लागेल तेव्हा सत्ययुगामध्ये श्रेष्ठ राज्य-कारभार करण्याची जी अपेक्षा बापदादांनी आपल्याकडून ठेवली आहे ती पूर्ण होऊ शकेल.**

शिवबाबांच्या विश्वविद्यालयाची विविध रूपे आहेत. येथे आपण खरे ज्ञानी-योगी बनू शकतो. येथे शिक्षण घेणारेच भविष्यात राज्य अधिकारी बनू शकतात. अनेक वेळा मी गंमतीने म्हणतो आहे की, कलियुगात सावकार, द्वापरयुगात राजा, त्रेतामध्ये महाराजा आणि सतयुगात विश्वमहाराजा बनण्याचा सराव करणे येथे संगमयुगावरच शक्य होते म्हणजे या ईश्वरीय विश्व विद्यालयात आल्यावर, चारही विषयांचा अभ्यास व प्राप्त शक्तींच्या आधारावरच आपल्याला भविष्यात काय बनायचे आहे ते ठरवू शकतो.

ईश्वरीय ज्ञानासंदर्भातील प्रथम प्रदर्शनीचे अंतिम चित्र ब्रह्माबाबांनी बनविले होते. त्या चित्रामध्ये पृथ्वी मृत्युशय्ये-वर दाखविली आहे व ॲटमबॉम्ब इत्यादी कोसळण्याच्या तयारीत असून बाजूला एक संन्यासी दाखविला आहे जो हे सांगत आहे की, कलियुग अजून बाल्यावस्थेत आहे. या चित्राखाली पिताश्री ब्रह्माबाबांनी पुढील महावाक्ये नमूद केली आहेत. आपले भाग्य, आपल्याच हाती आहे. आपले भाग्य ना कुणी बनवू शकत, ना बिघडवू शकत. आपल्या भाग्याचे आपणच मास्टर ब्रह्मा आहात. यावरून असे सिद्ध होते की, आपण स्वतःच आपल्या भाग्याचे निर्माता आहोत. **अव्यक्त मुरलीमध्ये बाबांनी म्हटले आहे की, मुलांनो, ज्ञान-योगाचे शिक्षण बाबा देतात परंतु पुरुषार्थ तर तुम्हालाच करायचा आहे. श्रेष्ठ पुरुषार्थ करण्यासाठी बाबा मार्गदर्शन देऊ शकतात. पण असे समजू नका की पुरुषार्थ पण बाबांनीच करावा व मुलांनी महाराजन् बनावे.**

आपल्या सर्व वरिष्ठ दादी या सगळ्या गोष्टींचे प्रत्यक्ष प्रमाण आहेत. या प्रकारे आपल्यालाही पुरुषार्थ करून हेही पाहायचे आहे की कुठे कमी राहिली आहे. किल्ला बनवतानाही त्यात काही कमी राहणार नाही याची खूप दक्षता घेतली जाते कारण एखादी राहिलेली कमीच शत्रूच्या हाती लागल्यास त्याला विजयी होण्यासाठी मदत मिळते. म्हणून सदैव किल्ला मजबूत बनविला जाई. अशाप्रकारे समस्यांशी लढताना आपल्यामध्ये काय कमतरता आहेत, हे ओळखून त्या सुधारण्याचा पूर्ण पुरुषार्थ केल्यास, भविष्यात आपले राज्य निर्विघ्न चालू शकेल.

एकदा मी साकार बाबांना विचारले की बाबा, माझ्या पुरुषार्थात काय कमी आहे? त्यावर बाबा म्हणाले, तुला सेंटर कसे चालवायचे याचा अनुभव नाही आणि या गोष्टी अनुभवानेच सर्वजण शिकतात. सेंटरवर येणे, मुरली ऐकणे आवश्यक आहेच परंतु सेंटर संचालित करण्याचा वास्तविक अनुभव असणे गरजेचे आहे. त्याबाबत जबाबदारी उचलली पाहिजे. बाबांना मी म्हणालो की तुम्ही मला शिकवा. तेव्हा

बाबा म्हणाले, सेंटर चालविण्याचा अनुभव तुला वेळेनुसार प्राप्त होईल आणि अगदी तसेच झाले.

१९७१ साली आम्ही न्युयॉर्कमध्ये नऊ आठवड्याहून अधिक काळ राहिलो. तेव्हा सेवाकेंद्राचे संचलन कसे करायचे ते मी आपोआप शिकलो. स्वयंपाकासाठी धान्य सामुग्री आणणे, कपडे धुणे, झाडू मारणे, भांडी घासणे इत्यादी कामे करीत होतो. आम्ही २५-३० किलो सामान बाजारातून घेऊन येत असू. जगदीशभाई झाडू मारण्याची सेवा करीत आणि भांडी स्वच्छ करण्याची जबाबदारी माझी असे तसेच मशीनमध्ये कपडे धुऊन काढण्याचीही. अशाप्रकारे सेवाकेंद्र चालविण्याचा अनुभव मला माझ्या सौभाग्याने मिळाला.

मी एकदा अव्यक्त बापदादांना विचारले की बाबा तुम्ही आमची परीक्षा का घेता? दुनियामध्ये येणाऱ्या अनेक प्रकारच्या परीक्षांना तोंड देण्यासाठी आम्हाला तुमची मदत हवी आहे. तरीसुद्धा आपण आमची परीक्षा घेतां, असे का? **यावर बाबांनी खूप सुंदर उत्तर दिले, 'जेव्हा तुम्ही बाजारात एखादा माठ खरेदी करण्यासाठी जाता तेव्हा ठोकून चेक करता की त्याला काही दोष तर नाही ना? तडकलेला तर नाही ना? तसेच मलासुद्धा अशा मुलांना निवडायचे आहे की जे सत्ययुग-त्रेतायुगाचा कारभार २५०० वर्षेपर्यंत अटल-अखंड आणि निर्विघ्न चालवू शकतील. सत्ययुग, त्रेतायुगात, तुमच्याजवळ कुणी वजीर नसणार व तुम्हालाच तुमचे राज्य सुचारु रूपाने चालवावे लागेल म्हणून लायक मुलांना निवडण्यासाठी मी त्यांची परीक्षा घेतो.'**

याप्रमाणे लौकिक दुनियेतही जेव्हा एखाद्या विशेष मोठ्या पदावर कुणाची नियुक्ती करायची असेल तर वृत्तपत्रांतून त्याची जाहिरात द्यावी लागते. त्यात लिहिले जाते की त्यांना ५-१० वर्षे अनुभव असलेली व्यक्ती हवी आहे म्हणजे अनुभवच त्या पदाची प्राप्ती करून देतो. संगमयुगात आपल्याला विश्वविद्यालय चालविण्याचा अनुभव मिळतो आणि म्हणूनच हे विश्व-विद्यालय खरोखरीच विश्वाचा राज्यकारभार शिकविणारे विद्यालय आहे. जो करतो त्यास प्राप्ती होते, हे आपण जाणतो परंतु जो शिकेल तोच करू शकेल आणि प्राप्तीही त्यालाच होईल. राज्य कारभार चालविण्यासाठी कितीतरी प्रकारच्या जबाबदाऱ्या आहेत जशी राज्यकारभाराची, धन संबंधित कार्यव्यवहाराची, प्रजेचा सांभाळ करण्याची आणि आपल्या राज्याचा विस्तार करण्याची जबाबदारी इत्यादी. अशाप्रकारे सूची बनवायला घेतली तर ती वाढतच जाईल. हे सारे आपल्याला संगम-युगातच शिकायला मिळते.

एक गोष्ट मी अवश्य लिहू इच्छितो की जेव्हा ब्रह्माबाबा अव्यक्त झाले तेव्हा शिव बाबांना अगदी वारंवार संदेशी भगिनींच्या तनामध्ये यावे लागत असे आणि आम्हाला छोट्या-छोट्या गोष्टी शिकवाव्या लागत असे. आम्ही प्रभूसंतान अनेक गोष्टींची माहिती घेण्यासाठी आदरणीय गुलजार दादीजींच्या माध्यमातून प्राणेश्वर शिवबाबांना संदेश पाठवित असू आणि मग बाबा आम्हाला मार्गदर्शन देत असत. आता आपण सारे जाणतो की सध्या बाबा पूर्ण वर्षातून केवळ १०-१२ वेळाच येत आहेत आणि संदेशद्वारे बाबांना कमी विचारणा केली जाते कारण आता आपणही सारे अनुभवमूर्त बनलो आहोत म्हणजे आम्हा मुलांना अनुभवीमूर्त बनविण्याची बाबांची दैवी योजना नक्की काय आहे आणि त्यात आपण कसे सफल होऊ शकू याची चर्चा पुढील लेखात करूया. *(क्रमशः)*

***(भावानुवाद : ब्र. कु. जयश्री, विक्रोळी-मुंबई).***

## तणावमुक्त कसे बनाल?

- एकदा केलेली चूक पुन्हा करू नका.
- आपली तुलना दुसऱ्याबरोबर करू नका.
- वर्तमानाला श्रेष्ठ बनविण्याचा पुरुषार्थ करा.
- बदला घेऊ नका, स्वतःला बदला.
- जी परिस्थिती बदलणे आपल्या हातात नाही, ती परमेश्वरावर सोडा.
- जितके शक्य असेल तितके दुसऱ्याचे सहयोगी बना.
- आपली निंदा करणाऱ्याला आपला मित्र समजा.
- कुणाची ईर्ष्या करू नका, ईश्वराचे चिंतन करा.
- अहंकाराचा त्याग करून नम्रता धारण करा.
- आपल्या सर्व चिंता ईश्वरावर सोपवा.

# सावर रे मना...

*(ब्र.कु.शिवानी बहेन यांच्या 'हॅपीनेस इंडेक्स' या पुस्तकावर आधारित)*

मागील लेखात आपण पाहिलं की प्रत्येकाला आयुष्यात चांगले-वाईट अनुभव येतच असतात. गत परिस्थितीला, त्या व्यक्तींना आपण बदलू शकत नाही पण स्वतःचे काही चुकत असेल तर सुधारू शकतो. वर्तमानकाळात जगण्याची कला ज्याला आली तो माणूस सुखी होतो. असं असूनही एक गोष्ट अशी आहे जी एकाचवेळी अनेकांच आयुष्य प्रभावित करते. पैशाचं झालेल नुकसान एकवेळ भरून काढता येतं पण आपल्या प्रिय व्यक्तीचा मृत्यु स्वीकारणं ही खरच खूप मोठी परीक्षा असते. या दुःखाचे घाव इतके खोलवर असतात की त्यातून सावरणं भल्याभल्यांना जमत नाही. या लेखात पाहूया की राजयोगाच्या सत्य ज्ञानाच्या आधारे आपण अशा कठीण परिस्थितीलाही कशाप्रकारे सामोरे जाऊ शकतो.

### ❐ मूलभूत प्रश्न मी कोण आहे ?

आतापर्यंत आपण नेहमीच माझं नाव, माझे नातेवाईक, माझी जबाबदारी असं म्हणत आलो. शरीराबद्दल उल्लेख करतानाही म्हणतो की हे माझे डोळे, माझे कान आहेत, माझा डावा हात खूप दुखतोय. पण हे सगळ माझं-माझं म्हणणारा मी कोण ? ते आपल्याला ठाऊक असायला हवं. आपल शरीर हे दोन गोष्टींनी मिळून बनलेल आहे. पाच तत्वांनी बनलेले अवयव, त्वचा, मांस, पेशी इत्यादी घटक आणि त्यांना उर्जा देणारी चैतन्य शक्ती आत्मा. इथे हे समजून घ्यायला हवं की हे माझ शरीर आहे असं म्हणणारी ती शक्ती म्हणजे मी आत्मा आहे. या शक्तीची किंवा उर्जेची निर्मिती करता येत नाही तसंच तिचा विनाशही होत नाही. शरीर थकतं, वृद्ध होतं आणि एके दिवशी अंतिम श्वास घेत. प्रकृतीच्या तत्वांनी बनलेलं असं शरीर भस्म झालं तरी ती उर्जा नाश पावत नाही. आत्म्याला म्हणूनच अजर, अमर, अविनाशी म्हणतात. **माणसाला सर्वात जास्त भय कशाच वाटत असेल तर ते मृत्युचं. पण जेव्हा मी आत्मा अविनाशी आहे ही समज येते तेव्हा हे भय नाहीस होतं. मी आत्मा शरीर धारण करतो व या जन्मात इतर व्यक्तिंशी विविध संबंधांनी बांधला जातो. कुठे जन्म घ्यावा आणि कधी शरीराचा त्याग करावा अर्थात मृत्यु यावा हे आपल्या कर्माच्या गुह्य गतीवर अवलंबून असतं.**

### ❐ आत्मा एक अखंड प्रवासी

ज्या कुटुंबात जन्म झाला, ज्यांच्या संपर्कात आलो त्या व्यक्तिंशी (शरीरधारी चैतन्य आत्म्यांशी) माझा (अर्थात आत्म्याचा) काहीतरी कर्मसंबंध आहे. ज्याला आपण उर्जेची देवाण-घेवाण म्हणतो. पूर्वजन्मातील कर्मांचा राहिलेला चांगला किंवा दुःखद हिशोब पूर्ण करण्यासाठी आपण पुन्हा वेगवेगळ्या संबंधात भेटत असतो. कोणी जन्माचे सोबती तर कोणी काही काळापुरते मित्र म्हणून. **जन्मापासून मृत्यु-पर्यंत आपण कर्मांचे लहान-मोठे अकाउंटस् पूर्ण करत असतो. आयुष्यमर्यादा संपली, जुना हिशोब पूर्ण झाला की मग तो आत्मा त्या शरीराचा त्याग करून दुसरीकडे जन्म घेतो. पुन्हा नव्याने चांगल्या-वाईट कर्मांचा हिशोब सुरू होतो.** जन्म पुनर्जन्माचा खेळ समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊया. समजा तीन दिवसांकरिता तुम्ही एखाद्या नातेवाईकाकडे पाहुणे म्हणून गेलात पण चौथ्या दिवशी जर दुसरीकडे जाण्यासाठी वचनबद्ध असाल तर त्या घरातून निघावेच लागेल. त्याचप्रमाणे चैतन्य आत्मा आपल्या प्रवासात पुढे-पुढे जात राहतो. आगगाडीच्या प्रवासात सगळे प्रवासी एकाच स्थानकात चढले आणि एकाच स्थानकावर उतरले असं होत नाही. प्रत्येकाच चढण्या-उतरण्याच ठिकाण आपापल असणारच कारण प्रत्येकाचा प्रवास हा वेगळा स्वतंत्र आहे.

### ❐ एक जीवनप्रवास संपला तरी ऋणानुबंध राहतो

कुटुंबातील सदस्याचा मृत्यू ही घटना जरी प्रत्येकाने अनुभवली असली तरी एखाद्या आई-वडिलांसाठी तरुण मुलाचा झालेला आकस्मिक अंत स्वीकारणं ही खूप कठीण गोष्ट असते. २१ वर्षांचा मुलगा 'रमेश' अपघातात गेल्याने दुःखी असलेल्या एका आईचा अनुभव इथे सांगावासा वाटतो. माय-लेकराचा स्नेह इतका अतूट होता की कामा-

निमित्त परदेशात वास्तव्य असलेल्या रमेशला आपल्या आईचा उदास मूड फोनवरूनसुद्धा ओळखता येत असे. त्याच्या आयुष्यात खुट्ट जरी झालं तरी इकडे ही माऊली कासावीस होत असे. म्हणजेच मनात विचार येताच उर्जेची देवाण-घेवाण होत असे. आता परिस्थिती अशी आहे की रमेश नाव धारण करणाऱ्या शरीराचा अपघातामुळे अंत झाला आहे. त्या चैतन्य आत्म्याने नवीन आईच्या पोटी जन्म घेतला आहे पण हे सत्य स्वीकारता न आल्याने रमेशची आई मात्र अजूनही शोक करत आहे. जेव्हा जेव्हा त्या मातेच दुःख अनावर होईल तेव्हा अशी उदास, नकारात्मक उर्जा निर्माण होत राहिल. विचार करा आता गतजन्मीच्या आईच्या दुःखाची ही उर्जा त्या बाळापर्यंत पोहोचत नसेल का? अवश्य पोहोचते पण आता दुसऱ्या शरीरात असल्यामुळे तो संपर्क साधू शकत नाही. आपण पाहतो की तान्हं बाळ कधी खुदकन हसतं तर कधी भोकाड पसरतं. या नवीन जन्मातले आई-वडील नातेवाईक इत्यादी गोष्टींशी अजून तो आत्मा पूर्णपणे जोडला गेला नाहीये. त्यामुळेच मागच्या जन्मात घडलेल्या चांगल्या-वाईट स्मृतींची छाप मूल थोडं मोठं होईपर्यंत कमी-अधिक प्रमाणात राहते.

### ❐ शांतीची शक्ती मोठी

खरतर दुसऱ्या जागी निघून गेलेला तो आत्मा व्यवस्थित असतो. त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ धार्मिक विधी करण्याची आपल्याकडे प्रथा आहे. पण आपण पाहतो की काहीजण अनेक उपाय करून पुढे गेलेल्या त्या आत्म्याशी संपर्क साधण्याचा, मागील स्मृती देऊन परत ओढण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्यामुळे होतं काय की भूतकाळाच्या आठवणी आणि वर्तमानातील नवीन संबंध यामध्ये त्या मुलाची पर्यायाने आत्म्याची ओढाताण होते. **आत्म्याला शांती मिळावी म्हणून होम हवन करणे पुरेसे नसते. समजा कुणी रडत-रडत हवनाचे विधी पार पाडत असेन तर शांतीच्या सकारात्मक उर्जेऐवजी दुःखाची प्रकंपनेच तिथे पोहोचतील. हे टाळणं आपल्या हातात आहे.** मी व माझ्या संबंध संपर्कात येणाऱ्या व्यक्ती, आपण सगळेच मूळ रूपात एक चैतन्य अविनाशी शक्ती आत्मा आहोत हे सत्य स्वीकारायला हवं. कितीही दुःख झालं तरी शोक करत बसायच नाही. शुभचिंतनात मोठी शक्ती सामावली आहे. **परमात्म्याच्या पवित्र आठवणीत राहून शांतीच दान देत राहिल्याने, पुढच्या प्रवासाला निघून गेलेल्या त्या आत्म्याला नवीन जन्मातही सुख-शांती नक्की मिळेल. राजयोगाचा हा अभ्यास जरूर करून बघा.**

सर्वप्रथम सुखासनात बसा, स्वतःला बघा, मी या शरीराला चालविणारी उर्जा, एक चैतन्यशक्ती आत्मा आहे, या शरीरात दोन भुवयांमध्ये मी ज्योतिर्बिंदू स्थित आहे, मी प्रकाशस्वरूप आत्मा आहे, शांतस्वरूप आहे. शांतीची प्रकंपनं माझ्यातून निघून वातावरणात पसरत आहेत. वर्तमानकाळाचा विचार करा. काही माणसं आता सोबत आहेत, काही काळाच्या ओघात दूर गेली आहेत. त्यांची आठवण येताच माझी आत्मिक स्मृती जागृत होत आहे. शांतीचा पवित्र श्वेत प्रकाश त्या दूर गेलेल्या आत्म्यापर्यंत पोहचत आहे. आत्म्याचा आत्म्याशी असलेला अविनाशी संबंध स्नेह, सुख, शांतीचा आहे. त्या पवित्र स्नेहाची प्रकंपनं त्या आत्म्यांना जाणवत आहेत. मी आत्मा शांत मन आणि स्थिर बुद्धीने आयुष्याला सामोरा जात आहे. ओम् शांती! *(भावानुवाद : ब्र. कु. मिनल, ठाणे.)*

## अंतर्मुखता सकळ ज्ञानाचे सार

अंतर्मुखता सकळ ज्ञानाचे सार।
बाप व मुलातील अंतर, दूर करी॥ १॥
अंतर्मुखता अतींद्रिय सुखाची खाण।
माया स्वये होई समर्पण, तिच्यापुढे॥ २॥
अंतर्मुखता अव्यक्त स्थितीचे साधन।
होशी सर्वगुण संपन्न, तेणे बळे॥ ३॥
अंतर्मुखतेने होई या जगाचा विसर।
आत्म्याचे घर-दार, सदा सामोरी दिसे॥ ४॥
अंतर्मुखी राहता अमृतवेळा सफल।
अन्यथा माया ती विफल, करीतसे॥ ५॥
अंतर्मुखी राहता शिव वसे अंतरी।
अवतार जणू तो भूवरी, दिसे सकळा॥ ६॥

*(ब्र. कु. ज्ञानेश्वर, धुळे.*

ब्रह्मावत्सांकरिता...

# ज्वाला स्वरूप अमृतवेळा

*ब्र.कु.चंद्रशेखर, शांतीवन (आबू रोड).*

**यावर्षी प्राणेश्वर शिवबाबांनी आपल्याला सदा संतुष्ट राहून दुसऱ्यांनाही संतुष्ट करण्याची तसेच स्वतः निर्विघ्न राहून आपल्या परिवाराला, सेंटरला, झोनला व यज्ञाला निर्विघ्न बनविण्याची जबाबदारी दिली आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी शिवबाबांनी युक्ती सांगितली आहे की ज्वालास्वरूप अमृतवेळा करा म्हणजे सर्व विकर्मांचा हिशोब समाप्त होऊन तुम्ही निर्विघ्न बनू शकाल.** त्याचबरोबर शिवबाबांशी सर्व संबंध जोडून अलौकिक संबंधांचा रस घ्या म्हणजे कुठल्याही देहधारीकडे बुद्धी जाणार नाही. सर्व गुण आणि शक्तीची अनुभूती करून स्वतःला भरपूर करा. त्यासाठी आपण प्रत्येकाने अमृतवेळेला विशेष शक्तिशाली ज्वालास्वरूप योग करण्याची आवश्यकता आहे.

परंतु शिवबाबांनी सांगितले की अमृतवेळेला बहुतांश मुलांची अवस्था ही शक्तिशाली नसते. कोणी उठून गुड मॉर्निंग करतात व पुन्हा झोपून जातात. कोणी उठून योगाला बसतात परंतु डुलक्या मारतात. कोणी अर्धवट झोपेत असतात तर कोणी जांभया देत असतात. आता यामध्ये आमूलाग्र परिवर्तन हवे आहे. त्यासाठी आपल्याला अमृत-वेळेचा योग पॉवरफुल केलाच पाहिजे. केवळ अमृतवेळेला उठून योग करणे पर्याप्त नाही तर त्यावेळी आपले मन व बुद्धी बीजरूप स्थितीत टिकली पाहिजे. परमात्म मीलनाची सुंदर अनुभूती झाली पाहिजे कारण अमृतवेळेचा समय हा परमात्मा शिव पित्याने आपल्या मुलांच्या मीलनासाठी निश्चित केलेला समय आहे. तो वरदानी समय आहे. त्याचा पूरेपूर लाभ आपण घेतला पाहिजे. त्यासाठी प्रामुख्याने कोणत्या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे, ते आपण प्रस्तुत लेखात पाहू या.

### ❐ रात्री झोपण्यापूर्वी किमान अर्धा तास योग करा

सर्वप्रथम आपल्याला झोपेच्या वेळेकडे लक्ष दिले पाहिजे. जास्तीत जास्त १०.३० ते ११.०० पर्यंत झोपलं पाहिजे. त्यानुसार आपली दिनचर्या सेट केली पाहिजे. अन्यथा विनाशी कार्यांमागे लागून अमृतवेळेच्या महान ईश्वरी सुखापासून आपल्याला वंचित रहावे लागेल. कारण इतर सगळी कार्ये तर संपूर्ण कल्पात होतच राहतील परंतु भगवंताशी वार्तालाप करण्याचे व त्याच्याशी योगयुक्त होण्याचे सुख केवळ संगमयुगातच प्राप्त होते. दुसरी गोष्ट म्हणजे रात्री जेवणानंतर बहुतेक जण गप्पा मारतात किंवा टी.व्ही. इंटरनेट, मोबाईल गेम्स यावर टाइमपास करतात. त्यामुळे मन-बुद्धीत व्यर्थ गोष्टींचा कचरा भरला जातो व त्याचा वाईट परिणाम अमृतवेळेवर होतो. म्हणून रात्री भोजनानंतर एकांतात राहिले पाहिजे किंवा विचार सागरमंथन करीत शतपावली केली पाहिजे. एखादा क्लास ऐकला पाहिजे किंवा अव्यक्त-वाणी वाचली पाहिजे. आपल्या डायरीत विशेष अनुभव, संपूर्ण दिवसाचा चार्ट अथवा मनन-चिंतन लिहिले पाहिजे. 'पीस ऑफ माइण्ड' हा आपला टी.व्ही. चॅनेल बघितला पाहिजे. फलस्वरूप आपली बुद्धी शांत व एकाग्र होत जाईल. दिवसभरातील कार्य व्यवहारातील सर्व गोष्टी शिवबाबांना सांगून मन हलके केले पाहिजे. आपल्या हातून जर काही चुका झाल्या असतील तर त्या शिवबाबांना सांगितल्याने अर्ध्या माफ होतील तसेच आपल्याला चुकांची जाणीव झाल्याने त्या आपल्या हातून परत होणारही नाहीत.

**तिसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे झोपण्यापूर्वी किमान २५-३० मिनिटे योगाभ्यास अवश्य केला पाहिजे. कारण 'अंत मति सो गति' या महावाक्यानुसार आपण झोपण्या-पूर्वी जर शांतीधाममध्ये शांतीसागर शिवबाबांजवळ असू तर झोपेतून उठतानासुद्धा शांतीधाममध्ये शिवबाबांजवळ स्वतःला अनुभव करू.** तसेच जागृत होताच आपण शिवबाबां-नाच पाहू आणि गुडमॉर्निंग करू. फलस्वरूप आपला संपूर्ण दिवस मंगलमय व सफलता संपन्न जाईल. तात्पर्य म्हणजे रात्री झोपण्यापूर्वी योगाचा नियम बनवा. त्यामुळे शिवबाबांची मदत अवश्य प्राप्त होईल. अमृतवेळेला आपोआपच जाग येईल. कोणीतरी आपला पलंग हलवित आहे, असे वाटेल. असा शिवबाबांच्या मदतीचा अनुभव करण्यासाठी झोपण्या-पूर्वी अर्धातास शिवबाबांची मोठ्या प्रेमाने आठवण करा.

## ❒ अमृतवेला - वरदानीवेला

अमृतवेळेचा एक सेकंदाचा अनुभव संपूर्ण दिवस व रात्रभर सर्व प्राप्ती स्वरूप स्थितीच्या अनुभवाचा आधार आहे. भोलेनाथ शिवबाबांचे सर्व भंडार यावेळी मुलांसाठी खुले असतात. त्यावेळी आपण आपल्या प्रारब्धाची झोळी भरू शकतो. वरदाता व भाग्यविधाता शिवबाबांकडून आपल्या भाग्याची रेषा हवी तेवढी खेचू शकतो. त्यावेळी शिवबाबा भोळ्या भगवंताच्या रूपात असतो, प्रेमाचा सागर असतो. त्या प्रेमाच्या आधारे आपणही लवलीन स्थितीचा अनुभव करू शकतो. त्यावेळी शिवबाबांची सर्व मुलांसाठी खुली ऑफर असते. खर तर यापेक्षा अधिक काय पाहिजे? त्यामुळे परमात्मा शिव पित्याच्या सर्व खजिन्यांचे 'बालक सो मालक' बना आणि अधिकार प्राप्त करा. कोणत्याही खजिन्याला त्यावेळी कुलुप लावलेले नसते. दिवसाभरात मात्र मोठ्या मेहनतीने त्याला चावी लावावी लागते. अमृतवेळेला केवळ एक संकल्प करा की 'बाबा! मी जो आहे, जसा आहे, तुझा आहे.'

## ❒ अमृतवेळेचा ज्वालास्वरूप योग

**अमृतवेळेला ज्वालास्वरूप योग करा. ज्वालास्वरूप योग अर्थात लाइट (प्रकाश) व माइट (शक्ती) संपन्न शक्तिशाली याद (स्मृती). जसे सूर्यामध्ये प्रकाश व शक्ती या दोन्ही गोष्टी आहेत.** सूर्य उदय होताच सर्वत्र प्रकाश पसरतो. त्याचबरोबर सूर्याच्या किरणांपासून शक्तीही प्राप्त होते. उदाहरणार्थ सोलर पॉवरमध्ये सूर्याच्या किरणांची शक्ती असते. अशाप्रकारे योगात लाइट व माइट या दोन्ही गोष्टी असल्या पाहिजेत. केवळ आपण अमृतवेळेला उठलो व योगात बसलो यावर खुश होऊ नका. त्यावेळी शक्तिशाली स्थितीचा अनुभव करा. शक्तिशाली स्थिती ऐवजी त्यात सुस्ती मिक्स करू नका. सुस्ती जर मिक्स झाली तर शिवबाबांशी कनेक्शन जुळणार नाही परिणामतः शिवबाबांशी मीलनाचा अनुभव होणार नाही. म्हणूनच अमृतवेळेचा योग मोठ्या उमंग-उत्साहाने केला पाहिजे. याचे प्रत्यक्ष उदाहरण आपण अनेक महारथींच्या जीवनात पाहिले आहे. **आपण जेव्हा मधुबनला जातो तेव्हा आदरणीय दादी जानकीजी स्नान करून मगच अमृतवेळेला बरोबर ४ वाजता डायमंड हॉल-मध्ये योग करण्यासाठी येतात. सामुहिक योग संपल्या-नंतर फरिश्ता स्वरूपात उभे राहून, सर्व ब्रह्मावत्सांना दृष्टी देतात. वयाच्या ९८व्या वर्षी, त्यांच्यात असलेला उमंग-उत्साह सर्वांसाठी खरोखरच प्रेरणादायी आहे.**

अमृतवेळेला योगाच्या वेळी जर सुस्ती येत असेल तर शिवबाबांच्या आठवणीत फिरले पाहिजे म्हणजे फ्रेश वाटेल. तसेच रोज नवीन-नवीन योगाचे अनुभव करा म्हणजे अमृत-वेळेच्या योगाची रूची वाढेल. रोज केवळ शांतीचा अनुभव न करता, वेगवेगळ्या गुणांचा अनुभव करा. कधी बीजरूप स्थितीचा तर कधी लाइट हाऊस-माइट हाऊस स्थितीचा, कधी पाच स्वरूपांचा, कधी सृष्टीच्या ग्लोबवर उभे राहून सर्वांना सकाश (शक्ती) देत असल्याचा. कधी मधुबनमध्ये जा, कधी स्वर्गात तर कधी निरनिराळ्या सेवाकेंद्रांना भेट द्या. अशी विविधता असेल तर अमृतवेळेच्या योगात रमणीकता वाढेल.

## ❒ अमृतवेळेच्या पहिल्या संकल्पाचे महत्व

अमृतवेळेच्या पहिल्या संकल्पाच्या आधारे संपूर्ण दिवसाची दिनचर्या होत असते. जसे गायन आहे, 'ब्रह्माचे संकल्पाने सृष्टी रचली', इतके संकल्पाचे महत्व आहे. जसे पिताश्री ब्रह्माबाबा आदिकाळात नवसृष्टीची रचना रचतात तसे आपण आदिकाळात अर्थात अमृतवेळेला जसे संकल्प रचू तशी संपूर्ण दिवसाची दिनचर्यारूपी सृष्टी होत रहाते. **अमृतवेळेला उठल्यावर सर्वप्रथम आपण शिवबाबांना 'गुड मॉर्निंग' करतो तेव्हा शिवबाबा देखील मुलांना दररोज 'समान भव' चे वरदान देतात ज्या वरदानात सर्व वरदान सामावलेले आहेत.** फलस्वरूप आपले स्वतःविषयी सदैव शुभचिंतन होत रहाते. तसेच जो शुभचिंतन करतो तो आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येक आत्म्याविषयी शुभचिंतक असतो. कसाही आत्मा असो, सतोगुणी असो वा तमोगुणी असो, तो सर्वांविषयी शुभचिंतक अर्थात अपकारीवर देखील उपकार करतो. त्याची कोणत्याही आत्म्यविषयी घृणादृष्टी नसते कारण तो हे जाणतो की हा आत्मा अज्ञानाच्या वशीभूत आहे अर्थात बेसमज आहे. अशाप्रकारे शुभचिंतक आत्मा स्वतःला विश्वपरिवर्तक, विश्वकल्याणकारी समजून, सर्व

▶ पान क्र. २७ वर

# अनादि ड्राम्यावरील महाकाव्य

वेदशास्त्रांचा सखोल अभ्यास करूनही, मनुष्य राहिला अज्ञानी
चार युगांच्या ड्राम्याचा आदि, मध्य, अंत
जाणूनी व्हावे त्रिकालज्ञानी ।।
या चार अंकी ड्राम्याचे हिरो-हिरोइन आहेत श्री लक्ष्मी-नारायण
तर या ड्राम्याचा महाखलनायक आहे दशानन रावण ।।
काळ पटल तो दूर होता, प्रथम अंकी दृष्य ते स्वर्गलोकाचे
सुवर्ण महाली निवास तेथे, सोळा कला संपन्न देवतांचे ।।
सूर्यवंशी श्रेष्ठ दैवी संस्कृतीचा, सुवर्णकाळ तो भारताचा
बाराशे पन्नास वर्षांनी प्रथम अंक हा समाप्त होतो सत्ययुगाचा ।।
सूर्यकुळाच्या दोन कला कमी होता, आरंभ जाहला त्रेतायुगाचा
रजतयुग ते चंद्रवंशी श्रीरामाचे, सेमी स्वर्ग जाहला स्वर्गाचा ।।५ ।।
सत्ययुग त्रेतात यथा राजा तथा प्रजा, असते संपूर्ण अहिंसक
दोन युगात एकही मानव नसतो, असुरी वृत्तीचा व हिंसक ।।
ड्राम्यातील द्वितीय अंकाच्या अंतासी, आरंभ होतो असुरी युगाचा
असुरराज रावण पराभव करतो, तेहतीस कोटी देवांचा ।।
मध्यंतरा पश्चात देवात्मेही, पुजारी जाहले तृतीय अंकात
या देवात्म्यांना दशाननाने, बंदिस्त केले आपुल्या कारागृहात ।।
ना सुवर्ण, ना राहिले रजत महाल, लयास गेले स्वर्गीय वैभव
स्वर्गवासींनाही रावणाने अभिशाप दिधला नर्कवासी भव ।।
स्वर्गाचे परिवर्तन नर्कात होताना, जागृत जाहले आत्म्याचे विकार
आत्मा विकारग्रस्त जाहल्यावरीच,
निर्माण होतात देहाचे विकार ।।१० ।।
आत्म्याचे विकार ठीक करण्या, आगमन होते रुहानी सर्जनचे
हाची सर्जन अभिवचन देतो, आत्म्याला निर्विकारी करण्याचे ।।
देहाभिमानाच्या वृद्धीने, कलियुगात वाढते शक्ती रावणाची
तीच शक्ती विस्मृती करविते, स्वदेश, स्वकर्म व स्वधर्माची ।।
विकर्मांच्या कारणे कर्मभोग भोगणे, अटळ असते कलियुगात
कर्मभोगांनाही ज्ञानयुक्त होऊनी, पार करावे संगमयुगात ।।
ज्ञान प्राप्त झाले म्हणूनी, अज्ञानी आत्म्यांना देऊ नये दोष
साक्षी होऊनी पहाल ड्रामा तर, दिसणार नाही त्यांचाही रोष ।।
ड्रामा पुनरावृत होतो हे जाणूनी, निश्चिंत रहावयाचे नसते
प्रारब्ध व पुरुषार्थ या दोन्हींचीही, नोंद ड्राम्यात असते ।।१५ ।।
असे का होते ? असे व्हायला नको होते, असे व्हायला हवे होते
प्रश्नांकित स्थिती ही प्रगती ट्रेनला ड्राम्याच्या रुळावरूनी घसरविते ।।
अनादि ड्राम्याचा नियम ज्ञात असावा, प्रत्येक मनुष्य आत्म्याला
या विश्वात आलेला आत्मा, विनाश कालेच जातो मुक्तिधामाला ।।
ज्या काही होऊनी गेल्या, शुभाशुभ घटना वर्तमान ड्राम्यात
त्याच व तंतोतंत तशाच, होतील घटना आगामी ड्राम्यात ।।
वर्तमान समयी, ज्या मनुष्यआत्म्याचा जो पार्ट ड्राम्यात असतो
त्याच नावारूपाचा पार्ट, त्याला कल्प-कल्प बजावावाच लागतो ।।
आत्म्याचा परमात्म्यावरी, तद्वतच निश्चय असावा ड्राम्यावरी
अशा निश्चय बुद्धीची, आवश्यकता असते संगमयुगावरी ।।२० ।।
परमात्म्याचाही या अनादि ड्राम्यात, पार्ट असतो दिग्दर्शनाचा
दिग्दर्शक होऊनी, नरालाही पार्ट देतो श्री नारायणाचा ।।
असे विधान करू नये कदापी, ड्रामा हा परमात्म्याने निर्मिला
प्रतिकूल व दुःखद परिस्थितीचा, दोष दिला जाईल त्याजला ।।
शिव परमात्मा नूतन मानवी सृष्टीचा, अवश्य आहे रचयिता
परंतु तो या अनाकलनीय व अनादि ड्राम्याचा, नाही निर्माता ।।
स्थापना, विनाश व पालना, ही कर्तव्य कर्मे आहेत परमात्म्याची
ड्राम्याचा आदि अंक पुनः येण्यास्तव, तो रचना करतो त्रिदेवांची ।।
भगवद् गीतेवरी नाम हवे होते, निराकार परमात्म्याचे
परंतु ड्राम्यात नामांकन मात्र जाहले, साकार श्रीकृष्णाचे ।।२५ ।।
सिमित दृष्टिकोनातून म्हटले जाते, गेलेली वेळ येत नाही पुनः
परमात्म ज्ञानानुसार वेळ ती येते, पाच हजार वर्षांनी पुनः ।।
चार धर्मांचे चार मुख्य ॲक्टर, ड्राम्यात बंधायमान असतात
अनेक धर्म स्थापन करण्याचे, त्यांचे पार्ट असतात ।।
सत्यधर्म स्थापनार्थ, परमात्म्यांचेही अवतरण अटळ असते
ब्रह्माद्वारे स्थापन होणाऱ्या सनातन धर्माची ड्राम्यात नोंद असते ।।
प्रथम पार्टची दिव्यस्मृती येण्यास्तव, ब्रह्मासी साक्षात्कार जाहला
'अहम चतुर्भुज विष्णु तत्‌त्वम्' म्हणूनी श्री विष्णु प्रगटला ।।
ब्रह्माचा पार्ट प्रत्येक कल्पाच्या, आदिपासूनी अंतापर्यंत असतो
म्हणूनी तोच या ड्राम्याचा,
प्रमुख हिरो पार्टधारी मानला जातो ।। ३० ।।
अशा हिरोपार्टधारी आत्म्यांस्तव महासल्लागार तो ब्रह्मलोकीचा
सल्ला हाच देतो, ज्ञानबाण मारूनी वध करावा रावणाचा ।।
जे मनुष्यआत्मे महाशत्रू रावणावरी, विजय प्राप्त करतात

तेची ड्राम्यातील सर्वात महान विजयाचे अधिकारी बनतात ।।
ड्राम्यातील सर्वोत्तम व निरंतर, पुरुषार्थी तेची असतात
जे स्वदर्शनचक्र धारण करूनी, चौऱ्यांशी जन्म प्राप्त करतात ।।
सर्वोत्तम पुरुषार्थानेच, संगमी ब्राह्मण जीवन होते हिरेतुल्य
प्रारब्ध रूपात सत्ययुगी दैवी जीवन, लाभते सुवर्णतुल्य ।।
आदि देवी व शिवशक्तींचा पार्ट, असतो भिन्न युगांवरी
शिव परमात्मा शिवशक्तींना, निर्माण करतो संगमावरी ।।३५ ।।
आत्म्याच्या उत्थान पतनाचा ड्रामा हा, चालतो चौऱ्यांशी पायऱ्यावरी
सर्वोच्च पायरी सर करण्या, जावे राजयोगाच्या लिफ्टवरी ।।
वैजयंति माळेतील मण्यांचे स्थान नसते, मायारहित देवतांचे
स्थान ते असते, मायेवरी विजय प्राप्त करणाऱ्या ब्राह्मणांचे ।।
वैश्विक ड्राम्यालाच परमात्म्याने म्हटले आहे 'खेळ हा हारजीतचा'
कधी विजय मायेचा तर कधी मायेवरी, विजय होतो आत्म्याचा ।।
रुहानी योद्धा होऊनी, असुरी संस्कारांचे रावण राज्य नष्ट करावे
सत्ययुगी दैवी राजसिंहासनावरी पुनः आसनस्थ व्हावे ।।
सूक्ष्म आत्म्यांत दैवी व असुरी पार्ट व्याप्त असतो, चौऱ्यांशी जन्मांचा
अन्य आत्म्यांनीही विचार करावा
या सर्वोच्च महान आश्चर्याचा ।।४० ।।
हृदच्या नाट्यप्रयोगात, कोणताही पार्ट बदलून दिला जातो
वर्ल्ड ड्राम्यात मात्र, प्रत्येकाला स्वतःचाच पार्ट बजाविता येतो ।।
विराट पृथ्वी रंगमंचावरील ड्रामा हा असे मनोरंजक फार
मनोरंजन समजूनीच प्रतिकूल परिस्थिती करावी पार ।।
अन्याय, अपमान व प्रतिशोधाचा एकही संकल्प मनी नसावा
अलौकिक जज् होवूनी ड्रामा न्यायपूर्ण असल्याचा निर्णय करावा ।।
ड्राम्यात कुणाचा पार्ट असामान्य, तर कुणाचा असतो सामान्य
परंतु मजसम पार्ट नसे कुणाचा, हे कोणीही करेल मान्य ।।
जे ड्राम्यात आहे तेच होत असते, जे नाही ते कदापी होत नसते
नथिंग न्यूचा पाठ पक्का करूनी, स्थितप्रज्ञ रहावयाचे असते ।।४५ ।।
कोणाच्याही मृत्युपश्चात दुःख, कदापी करावयाचे नसते
शरीर हे तर ड्राम्यासाठी, परिधान करावयाचे वस्त्र असते ।।
प्रत्येक कल्पातील ड्राम्यात, अंशमात्रही फरक नसतो
म्हणूनी समस्त घटनांचा, हर्षे स्वीकार करावयाचा असतो ।।
शुभकार्यात स्वस्तिकाचे चिन्ह, लाल गंधाने रेखाटले जाते
चिन्ह हे चार युगांच्या ड्राम्याचे असते, हे कुणाला ज्ञात नसते ।।
इतिहास तज्ञ जाणतात, द्वापर कलियुगाच्या असुरी अंकांना
पण ते जाणित नाहीत, सत्ययुग त्रेताच्या दैवी अंकांना ।।
चार अंकी ड्राम्यात, पाचवा गुप्त अंक सर्वांसाठी नसतो
तो केवळ, हिरो पार्ट बजाविणाऱ्या ब्रह्मावत्सांसाठी असतो ।।५० ।।
रामायण, महाराभारतासम, हिंसक कथा, ड्राम्यात नसतात
पुराणकथा या यथार्थ नसून, मानवी कल्पनाच असतात ।।
महाभारत युद्धाचे ड्राम्यातील दृष्य, कलियुगाच्या अंति असते
सत्ययुगात कृष्णासमवेत, कौरव पांडवांचे अस्तित्वच नसते ।।
ड्राम्याचे अत्यंत सुखदायी दृष्य असते, दैवी स्वर्गस्थापनेचे
तर अत्यंत दुःखदायी दृष्य असते, घोर महाविनाशाचे ।।
ड्राम्यातील प्रत्येक दृष्य, पसंत पडावयास हवे तुम्हा आम्हाला
यातील समस्त दृष्ये पसंत आहेत, आपुल्या परमपित्याला ।।
आपत्ती व व्याधीने निराश होऊनी, ज्ञानाला देऊ नये तिलांजली
अधिकांश सुख ड्राम्यात असते,
म्हणून भरावी भाग्याची अंजली ।। ५५ ।।
खुले हवे असेल तुजला, सत्ययुगी स्वर्गाचे स्वर्णिम फाटक
तर या कलियुगी मोहग्रस्त, मायावी नाटकात ना अटक ।।
चिंतन करू नये, ड्राम्यातील महाविनाश व कृष्णजन्माविषयी
चिंतन करावे ते केवळ आपुल्या, कर्मातीत स्थितीविषयी ।।
आत्मा, परमात्मा, प्रकृती, संकल्प,
कर्म व कर्मफल हा ड्राम्याचा आधार
श्रेष्ठ कर्मे करूनी, श्रेष्ठ कर्मफल प्राप्त करण्या, करावा निर्धार ।।
ड्राम्याचे यथार्थ ज्ञान प्राप्त करूनी, सर्वोच्च लक्ष्य निश्चित करावे
विषय सागराच्या लाटातही, श्रीविष्णूसमान निश्चिंत रहावे ।।
कलियुग अंतासी, चार अंकांच्या ड्राम्याचे, एक चक्र पूर्ण होते
चक्राला या पुनर्गती देण्याचे, कर्म मात्र परमात्म्याचे असते ।।६० ।।
मानवी सृष्टीचे अस्तित्व नसते, अन्य कोणत्याही ग्रहावरी
समाप्तिविना ड्रामा हा अखंड, चलायमान असतो केवळ पृथ्वीवरी ।।
चौसष्ट श्लोकांचे हे महाकाव्य, प्रत्येक कल्पात लिहिले जाईल
संपूर्ण ड्रामा यथार्थ आहे, निर्णय हा प्रितबुद्धीचा होईल ।।
धन्य जाहलो आम्ही ब्रह्मावत्स, ज्ञान घेऊनी अनादि ड्राम्याचे
अनंत उपकार ते, कदापी फिटणार नाहीत, त्या अनंताचे ।।
प्रश्नचित्त आत्म्याने, महाकाव्य हे, प्रसन्नचित्त होण्यास वाचावे
ड्राम्यातील आपुल्या, सर्वोत्तम भाग्याला जाणूनी,
सदा आनंदे नाचावे ।। ६४ ।।

*-- ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे.*

ब्रह्मावत्सांकरिता...

# अलौकिक ब्राह्मण जीवनाचे कर्तव्य

ब्र.कु.गोदावरी, मुलुंड.

**ब्राह्मण जीवनाचे मुख्य कर्तव्य आहे, लौकिकचे अलौकिक मध्ये परिवर्तन करणे, कोणत्याही लौकिक वस्तू वा व्यक्तीला बघताना तिला अलौकिक स्वरूपात परिवर्तन करणे. वास्तविक ही गोष्ट प्रॅक्टीकल मध्ये फार सहज आहे परंतु त्यासाठी सतत लक्ष (अटेंशन) ठेवण्याची आवश्यकता आहे. आपल्या दृष्टीला, वृत्तीला, वायब्रेशन्सला, वायुमंडलला लौकिक पासून अलौकिक बनविण्यास अभ्यास करण्याची गरज आहे.** ब्राह्मणांचा जन्मच मुळी अलौकिक आहे. जसा आपला पिता अलौकिक आहे, परिवार देखील अलौकिक आहे तसेच आपले कर्मसुद्धा अलौकिक असले पाहिजे. त्यासाठी जशा आपण शरीराच्या क्रिया करतो तशा आत्म्याच्या क्रिया अर्थात आत्म्याचे भोजन, आत्म्याचे फिरणे, आत्म-रूपात पाहणे, आत्म्याचे चिंतन करणे, आत्म्याचा पुरुषार्थ या गोष्टीसुद्धा त्यासोबत केल्या पाहिजेत म्हणजे लौकिकचे अलौकिकमध्ये परिवर्तन अगदी सहज अनुभवाला येईल.

अशाप्रकारचे लौकिकचे अलौकिक परिवर्तन केल्याने लौकिक कार्याचे आकर्षण वा ओझे वाटणार नाही. तसेच डबल कमाईचा अनुभव होत राहिल. त्याचबरोबर डबल लाइट (दुहेरी हलकेपणा) स्थिती अनुवाला येईल. कारण आपले अलौकिक ब्राह्मण स्वरूप आहे ट्रस्टी (विश्वस्त). जेव्हा आपण स्वतःला ट्रस्टी समजून कुठलेही कार्य करतो तेव्हा कुठल्याही प्रकारचे ओझे वाटत नाही. अलौकिक स्वरूप अर्थात 'कमल पुष्प समान'. कसेही तमोगुणी वातावरण असो, वायब्रेशन्स असोत परंतु सदा कमल आसन अर्थात लौकिकरूपी चिखलात राहून देखील त्यापासून अलिप्त, त्याच्या आकर्षणापासून अलिप्त (न्यारे) व सदा शिवबाबांचे प्रिय स्थिती अनुभवाला येणे. फलस्वरूप अलौकिक ब्राह्मण कुठल्याही विकारी व्यक्तीच्या संपर्कात आल्यानंतर स्वयं विकाराच्या वशीभूत होणार नाही. कारण त्याला आपल्या अलौकिक कार्याची स्मृती असेल की मला विकारांच्या वशीभूत आत्म्यांना निर्विकारी बनवायचे आहे अर्थात लौकिक पासून अलौकिक बनवायचे आहे. त्यामुळे तो स्वतः कधीही विकारांच्या वशीभूत होणार नाही. त्याचा आत्मिक स्मृती, अलौकिक दृष्टी व अलौकिक वृत्तीचा पाठ पक्का असेल.

**अलौकिक जीवनातील स्मृती, दृष्टी व वृत्ती**

**ब्राह्मण जीवनाचा पहिला पाठ आहे - आत्मिक स्मृतीचा.** हा पाठ अत्यंत महत्वाचा असल्याने, तो अगदी पक्का असला पाहिजे. आत्मा या शरीराद्वारे आत्म्यालाच पाहिल; शरीराला कदापी नाही. मी आत्मा कर्मेंद्रियाद्वारे कर्म करीत आहे, ही स्मृती असेल तर अन्य आत्म्यांना कर्म करताना पाहून हीच स्मृती राहिल की तो आत्मा कर्म करीत आहे.

**दुसरा पाठ आहे अलौकिक दृष्टी अर्थात कुणालाही पाहताना त्याचे आत्मरूप पाहणे.** बऱ्याच जणांचा हा अभ्यास कमी असल्याने, अलौकिक दृष्टीचा पाठ अजूनही पक्का नसल्याचे दिसून येते. परिणामतः दुसऱ्यांना पाहतांना त्यांच्या अलौकिक स्वरूपाऐवजी लौकिक रूप दिसून येते. त्यांच्या-तील कमजोरी वा अवगुण दिसून येतात.

**तिसरा पाठ आहे, अलौकिक वृत्ती अर्थात प्रत्येक आत्म्याच्या संबंध संपर्कात येताना शुभभावना, कल्याणाची भावना बाळगणे.** परंतु अशाप्रकारची अलौकिक वृत्ती बाळ-गण्याऐवजी लौकिक वृत्ती असेल, अवगुण बघण्याची आणि धारण करण्याची वृत्ती असेल, ईर्ष्या आणि घृणाभावची वृत्ती असेल तर अलौकिक परिवाराद्वारे अलौकिक सह-योगाची खुशी, अलौकिक स्नेहाची प्राप्ती होणार नाही. म्हणूनच लौकिक वृत्तीला अलौकिक वृत्तीत परिवर्तन करा. त्याचबरोबर लौकिक संबंधात देखील अलौकिक संबंध अर्थात आत्मिक भाऊ-बहिणीची स्मृती ठेवा. कोणत्याही संबंधाकडे जर लौकिक संबंधाचे आकर्षण आकर्षित करीत असेल तर ती मोहाची दृष्टी आहे असे समजा. वास्तविक शिवबाबांशी सर्व अविनाशी संबंधाची स्मृती तसेच अनु-भूतीची कमी असल्यानेच, लौकिक संबंधाकडे बुद्धी आकर्षित होते. असे होऊ नये, यासाठी एक शिवबाबांशी सर्व संबंधांची अनुभूती करणे आवश्यक आहे.

▶ पान क्र. २२ वर

# निर्विघ्न बनण्यासाठी लवलीन स्थितीत रहा

*ब्र.कु.भगवानभाई, शांतीवन (आबूरोड).*

वर्तमानसमयी या बाह्य जगापासून जर स्वतःला सुरक्षित ठेवायचे असेल तर प्रभुस्मृतीत, प्रभु प्राप्तीत स्वतःला लवलीन ठेवणे गरजेचे आहे. या अवस्थेत आत्मा, प्रभुप्रेमाच्या अनुभवामुळे बाह्य जगाच्या भौतिक व क्षणिक आकर्षणापासून दूर रहातो. तसेच आत्म्यामध्ये एका नवीन उर्जेचा संचार होऊ लागतो. परिणामतः अंतर्मुखतेची अवस्था अनुभवाला येते. त्यामुळे स्वतःला अन्य काहीही प्राप्त करण्याची इच्छा रहात नाही. साहजिकच अशा लवलीन स्थितीमुळे आपण स्वतःला निर्विघ्न बनवू शकतो. अशी लवलीन अवस्था बनविण्यासाठी कोणता पुरुषार्थ करणे आवश्यक आहे, ते आपण प्रस्तुत लेखात पाहूया.

**१) परमात्म प्रेमात सदैव मग्न रहा**

**परमात्मा शिव पित्याने या सृष्टीवर अवतरित होऊन, आपल्यावर जे अनंत उपकार केले आहेत, ज्या अपार प्राप्ती करविल्या आहेत, जी पालना दिली आहे. त्याची मनात पुन्हा-पुन्हा आठवण करा. तो आपल्याला भविष्यात काय बनवू इच्छितो, याची आठवण करा म्हणजे आपोआपच आपल्या मनात परमात्म प्रेम जागृत होईल. अशाप्रकारे परमात्म प्रेमात मग्न वा भावविभोर होणे, हीच खरी लवलीन अवस्था होय.** या अवस्थेत स्थित झाल्याने आपण स्वतःही निर्विघ्न बनतो तसेच दुसऱ्यांचेही कल्याण करण्यासाठी निमित्त बनतो. या अनुषंगाने मातेश्वरी मम्मांच्या जीवनातील एक प्रसंग नमूद करावासा वाटतो.

दिल्लीमध्ये एक मनुष्य होता तो पवित्रतेच्या मुद्द्यावर आपल्या पत्नीला फार त्रास देत होता. परंतु नातेवाईकांना मात्र तो सांगत असे की माझी पत्नी मुलांचा सांभाळ करीत नाही. या कारणाने त्याने आपल्या पत्नीला घरातून हाकलून दिले होते. अशा परिस्थितीत त्या मातेला महिला आश्रमात ठेवण्यात आले होते. तेथे राहून ती रोज सेवाकेंद्रावर येत असे. काही दिवसानंतर मम्मा दिल्लीतील राजोरी गार्डन सेवाकेंद्राला भेट देण्यासाठी आल्या. ही गोष्ट कुठूनतरी त्या माणसालाही कळली. तेव्हा तो मम्मांशी भांडण्यासाठी सेवाकेंद्रावर आला. सेवाकेंद्रावर आल्या-आल्या त्याने तेथील सतरंजी फेकून दिली. बल्ब फोडून टाकला आणि जोरजोरात आदळ-आपट करत मम्मांना शोधू लागला. मम्मा सर्वात वरच्या मजल्यावर खुर्चीत बसून लवलीन स्थितीत योग करीत होत्या, तेथे ती व्यक्ती पोहचली. मम्मांनी त्याला पाहताच मोठ्या प्रेमाने म्हटले, 'आओ बच्चे!' हे शब्द कानी पडताच त्याच्या अंतःकरणातून शब्द बाहेर पडले, 'माँ, माँ, माँ'. त्याच्या मनातील सर्व प्रश्न समाप्त झाले. मम्मांनी त्याला पुन्हा विचारले, 'बोलो बच्चे, कैसे आये?' ती व्यक्ती म्हणाली, 'कुछ नही।' त्याच्या मनातील सर्व तक्रारी दूर झाल्या होत्या. आपण येथे भांडण करायला आलो आहोत याचाही त्याला विसर पडला होता. तो मम्मांवर प्रभावित झाला. तो खाली जमिनीवर बसून, शांतपणे मम्मांची दृष्टी घेऊ लागला. नंतर बाहेर येऊन सर्वांना सांगू लागला की मम्मा फार महान आहे. तात्पर्य म्हणजे ईश्वरी प्रेमात लवलीन स्थितीद्वारे सर्व समस्या एक सेकंदात समाप्त होतात.

**२) ईश्वरी प्रेम एक नशा आहे**

ज्याप्रमाणे नशा केल्यानंतर व्यक्ती सर्व काही विसरून जाते त्याप्रमाणे ईश्वरी प्रेमाच्या नशेत आपल्या पुराण्या स्वभाव-संस्कारांचा विसर पडतो. तसेच ईश्वरी प्रेमाच्या नशेमुळे आपण आत्मस्वरूपामध्ये वा निजी सद्‌गुणांच्या स्वरूपामध्ये टिकून रहातो. फलस्वरूप परमानंदाची अनुभूती होऊ लागते. त्यामुळे साहजिकच बाह्य जगाचा वा भौतिक जगाचा विसर पडून, आंतरिक जगताचा अनुभव झाल्याने आपण लवलीन स्थितीचा अनुभव करतो. ईश्वरी नशा चढण्यासाठी स्वमानात रहाण्याची आवश्यकता आहे. स्वमानात स्थित झाल्याने ईश्वरी नशा चढतो. फलस्वरूप आपली चढती कला होते. याउलट देहअभिमानाच्या नशेमुळे आत्म्याचे पतन होते.

**३) रचनात्मक कार्य करा**

ईश्वरी प्रेमात टिकण्यासाठी अर्थात लवलीन स्थिती

बनविण्यासाठी सदैव रचनात्मक कार्य करा. रचनात्मक कार्य केल्याने आपल्याला इतरांकडून आशीर्वाद प्राप्त होतात. आंतरिक खुशी प्राप्त होते. परिणामतः मन सशक्त बनते. **म्हणूनच शिवबाबा नेहमी सांगतात की 'मुलांनो, तुम्ही सेवा करा. सेवा ब्राह्मण जीवनाचा स्वाभाविक धर्म आहे. सेवाभाव अर्थात सदैव प्रत्येक आत्म्याविषयी शुभभावना आणि श्रेष्ठ कामनांचा भाव. मनसा, वाचा, कर्मणा सदैव श्रेष्ठ कर्म करीत रहा. ज्यामुळे तुमचेही कल्याण होईल तसेच दुसऱ्यांचेही कल्याण होईल.'** अशाप्रकारे काही ना काही नवीन रचनात्मक कार्य करीत राहिल्याने स्वतःबरोबर इतरांचा विकास होत जातो. याचेच गायन आहे, 'चढती कला तेरे बहाने सर्व का भला'. केवळ दुसऱ्यांना शिवबाबांचा परिचय देणे, साप्ताहिक कोर्स करणे या काही मोठ्या गोष्टी नाहीत. परंतु आत्म्यांना शक्तिशाली बनविणे, ही खरी सेवा आहे. सेवा करताना निमित्त भाव असेल तरच सेवेत सफलता प्राप्त होते. त्याचबरोबर निराकारी, निरहंकारी व निर्विकारी या तिन्ही विशेषता निमित्तभाव धारण केल्याने, स्वतः येतात. फलस्वरूप आत्मा लवलीन स्थितीचा अनुभव करतो.

**४) लवलीन रहाण्यासाठी प्रेमस्वरूप स्थितीची आवश्यकता**

संत कबीरांनी लवलीन बनण्यासाठी प्रेम ही अडीच अक्षरे वाचायला सांगितली आहेत. ही अडीच अक्षरे वाचणे अर्थात प्रेमस्वरूप बनल्यानेच आपण खऱ्या अर्थी ज्ञानी बनू शकतो. एकदा का प्रेम या शब्दाला वाचले वा समजले की मग बाकी काही वाचणे वा समजणे गरजेचे नसते. **प्रेम आहे जीवनरूपी इमारतीचा भरभक्कम असा पाया! ते आहे जीवनाचे सर्वश्रेष्ठ सार. प्रेम आहे आनंदाची जननी तसेच जीवनाचा गोडवा! हृदय वीणेचे मधुर स्पंदन! आत्मिक सौंदर्याचे दुसरे नाव आहे प्रेम! प्रेम आहे हृदयाची परिभाषा. म्हणून ज्ञानसागर परमात्मा सुद्धा आपल्याला ज्ञानाचे सार हेच सांगतात की मुलांनो परमात्म प्रेमात लवलीन रहा म्हणजे बाकी सर्व काही चांगलेच होईल.**

जर कोणी आपल्याशी संघर्ष करीत असेल तर त्याला प्रेमाचे जल द्या म्हणजे क्रोधाग्नी समाप्त होईल. त्याऐवजी जर आपण 'हे असे का, हे बरोबर नाही' असे म्हटले तर आगीत तेल टाकण्यासारखे आहे. म्हणून सदैव नम्रतेचे कवच परिधान करा म्हणजे दुसऱ्याकडून देखील स्नेह व सहयोग प्राप्त होईल.

**५) सदैव खुश रहा**

अव्यक्त बापदादांनी यावर्षी प्रत्येक मुरलीतून सदैव खुश राहण्याचा पाठ आपल्याला शिकवला आहे. कारण जो सदा खुश राहतो तो प्रभुप्रेमात लवलीन राहू शकतो. एखाद्या बागेत गेल्यावर तेथील गुलाब पुष्पांची सुंदरता आणि सुगंध सर्वांची मने आकर्षित करतो. त्यांच्यासाठी लहान-मोठा, गरीब-श्रीमंत हा भेदभाव नसतो. त्याचप्रमाणे जो परमात्म प्रेमात लवलीन असतो, तोसुद्धा सर्व आत्म्यांचा प्रिय असतो. कारण त्याच्या संकल्पातही शिवबाबा, बोलमध्ये ही शिवबाबा, कर्मातही शिवबाबांची सोबत असते. असा लवलीन आत्मा एक शब्द बाबा जरी बोलला तरी त्याचे प्रेमाचे बोल दुसऱ्यालाही परमात्म स्नेहात खेचून आणतात. असा लवलीन आत्मा जणू आत्मिक जादुगार असतो.

**६) लवलीन बनण्यासाठी आत्मस्वरूपात टिकणे आवश्यक**

लवलीन बनण्यासाठी देहभान पूर्णतः विसरून आत्मिक स्वरूपात टिकण्याची आवश्यकता आहे. आत्मस्वरूपात टिकणे, हीच खरी विशालता आहे. त्यामुळे परमात्मा पित्याची स्मृती सहजच राहते कारण परमात्मा, सर्व आत्म्यांचा पिता आहे. तसेच सर्व आत्म्यांचे सर्व संबंध (माता, पिता, बंधु, सखा) एक परमात्म्याशीच आहेत. जितकी-जितकी आपली आत्मिक स्थिती शक्तिशाली असेल तितकी सहजच आपल्याला ही जाणीव होईल की आज कुठलेतरी विघ्न अथवा पेपर येणार आहे. अशाप्रकारची जाणीव झाल्यामुळे आपण त्याला तोंड देण्यासाठी तयारीत असतो. फलस्वरूप विघ्नावर विजय प्राप्त करतो.

**७) लवलीन स्थितीसाठी दाता बनण्याची आवश्यकता**

**परमात्म प्रेमात लवलीन रहाण्यासाठी नेहमी दाता बनून, इतरांना देण्याचे कार्य करा. इतरांकडून मागण्याची वा प्राप्तीची इच्छा करणारा लवलीन स्थितीत राहू शकत नाही. परमात्मा जसा दाता आहे तसेच आपण त्याची मुले. इतरांना ईश्वरी ज्ञान, गुण व शक्ती प्रदान करूया.** वास्तविक संगमयुगातील आपला हा ब्राह्मण जन्म देण्यासाठीच आहे.

आपण ईश्वरी सेवेत उपस्थित आहोत. 'पाना था सो पा लिया' हे आपल्याच स्थितीचे गायन आहे. त्यामुळे परमात्म प्राप्तीनंतर आपल्या मनात बाह्य जगाची कुठलीही इच्छा उत्पन्न होता कामा नये. एवढंच नव्हे तर दुसऱ्यांनी मला मान दिला तरच मी देईन; दुसऱ्यांनी मला देण्याची संधी दिली तरच मी देईन, ही दात्याची लक्षणे नव्हेत. म्हणूनच सर्वप्रथम दाता बनून मला द्यायचे आहेत, ही भावना मनात ठेवा. दुसऱ्यांकडून कुठलीही अपेक्षा ठेऊ नका तरच आपण सदैव लवलीन राहू शकू.

अशाप्रकारे आपले जीवन सदैव विघ्नांपासून मुक्त, निर्विघ्न बनविण्यासाठी वरील ज्ञानबिंदूची धारण करा म्हणजे जीवनात परमसुखाचा अनुभव होत राहिल. वास्तविक ब्राह्मण जीवनात विघ्न येणे स्वाभाविक आहे कारण ही कलियुगी दुनिया तमोप्रधान आहे. दुसरी गोष्ट म्हणजे आताच आपल्याला साऱ्या कल्पातील कर्मांचा राहिलेला हिशोब पूर्ण करावयाचा असतो. तसेच संगमयुगात आपण मायेचा पक्ष सोडून प्रभुच्या पक्षात सामील होतो. त्यामुळे माया विघ्न आणण्याचा प्रयत्न करीत असते. **परंतु जसे लहान मूल आपल्या मातेच्या कुशीत सर्वाधिक सुरक्षिततेचा अनुभव करतं तसेच परमात्म प्रेमात लवलीन आत्मा सदैव निर्विघ्न आणि निश्चिंत स्थितीचा अनुभव करतो. याचेच गायन आहे, 'तुम मातपिता हम बालक तेरे। तेरी कृपा से सुख घनेरे।'**

**सदैव लक्षात ठेवा की आपली लवलीन अवस्था व सर्वांशी प्रेमपूर्ण व्यवहार याद्वारेच आपण परमात्म प्रत्यक्षता करू शकू.** ईर्ष्या, द्वेष, घृणा, अहंकार या सर्व गोष्टी लवलीन बनण्यासाठी घातक आहेत. त्यामुळे सर्वांविषयी बेहदच्या शुभभावना ठेवा. सर्वजण निर्दोष आहेत, अपूर्ण आहेत अशी भावना ठेवल्यामुळे इतरांविषयी दयाभाव, क्षमाभाव जागृत होईल. सर्वांशी प्रेमपूर्ण व्यवहार, हेच जीवनाचे सार आहे. याद्वारेच आपण सर्वांना निःस्वार्थ प्रेम, ईश्वरी प्रेम तसेच बंधुत्व भावनेचा अनुभव करवू शकतो. **मुख्य म्हणजे सदैव लवलीन राहिल्यानेच आपण सहज योगी, निरंतर योगी व तीव्र पुरुषार्थी बनून कमी वेळेत भरपूर कमाई जमा करू शकतो.** ❖❖❖

# मनाला सुखी व प्रसन्न बनविण्याचे अमूल्य उपाय

- लक्षात ठेवा - सुख-शांती आपल्या मनात असते, वस्तुंमध्ये नसते.
- **आपल्याशिवाय या जगात आपल्याला कोणीही खुशी देऊ शकणार नाही.**
- धन आपल्याला सर्व काही देऊ शकते; परंतु खरी सुख-शांती देऊ शकणार नाही.
- सुखाचा झरा (वा सरिता) आपल्या आतच आहे. त्याला बाहेर शोधण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे.
- जरी आपल्याला विश्वाचा सम्राट बनवले अथवा आरामाची सर्व साधने आणि वस्तू दिल्या तरी याची गॅरंटी नाही की तुम्ही सुखी व्हाल.
- **सुख-शांती आत्म्याचा स्वधर्म आहे, जो कोणत्याही सांसारिक वस्तू वा इंद्रिय सुखापासून प्राप्त करता येत नाही.**
- तणावाचे कारण आपल्या मनात असते. जोपर्यंत आपण मनाला समजून घेत नाही तोपर्यंत तणावाचे व्यवस्थापन करणे, असंभव आहे.
- प्रसन्नता आपला अमूल्य खजिना आहे. लहान-सहान गोष्टीत वा परिस्थितीत तो व्यर्थ गमवू नका.
- **आध्यात्मिकतेच्या मार्गावर चालून, ईश्वरी ज्ञान व राजयोगाच्या अभ्यासानेच जीवनात आत्मिक सुख व शांतीची अनुभूती होते.**

---

▶ पान क्र. १९ वरून

सदैव लक्षात ठेवा की शिवबाबांकडून प्राप्त सर्व संबंधांचा रस व देहधारी संबंधांकडून प्राप्त अल्पकाळाचा रस यामध्ये महान अंतर आहे. तात्पर्य म्हणजे देहाचे आकर्षण, देहाची दृष्टी, देहाद्वारे प्राप्त होणारा रस हा अल्पकाळचा रस असून, शिवबाबांपासून मिळणाऱ्या अमृतरसापासून वंचित करणारा आहे. म्हणूनच गायन केले जाते 'अमृत छोड विष क्यूँ पिये।' **त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की आत्मिक स्मृती, अलौकिक दृष्टी व अलौकिक वृत्ती हेच अलौकिक ब्राह्मण जीवनातील अमृत होय, जे प्राशन केल्यानेच मानव भविष्य** २० जन्मांकरिता अमर देवता बनतो. ❖❖❖

# हे विद्यादेवी माता सरस्वती, तुज नमो...

*ब्र.कु.हेमंतभाई, शांतीवन (आबूरोड).*

विश्व क्षितीजावर वेळोवेळी अनेक मानव नक्षत्र येतात आणि काळाच्या पडद्याआड जातात. परंतु त्यातील अल्प थोर विभूतीच स्वतःच्या भव्य, दिव्य, अलौकिक, उज्ज्वल चारित्र्याने इतिहासात अमर स्थान प्राप्त करतात. अशाच विशेष विभूती युगायुगापर्यंत जनमानसात जिवंत राहतात. त्यांची शुभ कर्मे दिव्यदर्पण बनून सर्वांना पुण्यकर्मांची प्रेरणा देतात. त्यांचे आचरण सत्कर्माचा जणू आरसाच असतो. साधारण जनसुद्धा लोक-परलोक सुधारण्यासाठी त्यांच्याच पावलावर पाऊल टाकतात. अज्ञानरूपी अंधःकारात भटकणाऱ्यांसाठी ते जणू दीपस्तंभासम असतात. अशा **महान आत्म्यांचे जीवन म्हणजे जगाच्या कल्याणासाठी आणि मानवतेच्या सेवेसाठी समर्पित लोकसेवा यज्ञच होय. अशाच चिरकाल स्मरणीय, पूजनीय, वंदनीय, आत्म्यांमधील एक अग्रज, न भूतो न भविष्यती अशा अद्वितीय परमश्रेष्ठ उदाहरणमूर्त होत्या मातेश्वरी जगदंबा सरस्वती.**

परमात्मा शिव पित्याची सर्वश्रेष्ठ रचना व प्रजापिता ब्रह्माबाबांची मानसपुत्री बनून श्रेष्ठ कर्माच्या करामतीने, त्यांनी आदर्श प्रस्थापित केला. खरं तर त्या मन, वचन, कर्मांनी ईश्वरी वचनांच्या साकार प्रतिमा आणि सर्व दैवी गुणांची चैतन्य मूर्ती होत्या. कन्या असूनही जगदंबा मातेचा गौरव प्राप्त करणाऱ्या मातेश्वरींचा पुरुषार्थ उच्चकोटीचा होता जो आजही अनेकांना प्रेरणा देत आहे. परमात्मा शिव पित्याच्या महावाक्यांना साध्या सरळ शब्दात स्पष्ट करून, आपल्या कर्मांद्वारे त्यांना साकार करून, मातेश्वरींनी अनेकांना मार्गदर्शन केले. त्या ईश्वरी ज्ञानयज्ञाच्या प्रथम प्रशासिका अथवा यज्ञमाता होत्या. अल्पकाळातच त्यांनी पुरुषार्थाचे शिखर गाठून, इतरांसाठी पुरुषार्थाची वाट सोपी केली. त्यांच्या एक-एक हिंमतयुक्त, त्याग-तपस्यायुक्त कर्मात दिव्यता सामावलेली होती. आजही त्यांच्या पुण्यतिथीच्या पावनवेळी (२४ जून रोजी) त्यांच्या प्रेरणा-दायी विशेषतांचे स्मरण करून त्या आपल्या आचरणात आणूया; हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. मातेश्वरी मम्मांचे जीवन अनेकानेक विशेषतांनी संपन्न होते. त्यातील काही निवडक विशेषतांचा थोडक्यात आढावा आपण प्रस्तुत लेखात पाहणार आहोत.

**१) चिंतनात आध्यात्मिकता :** 'जसे ज्याचे चिंतन तसे त्याचे चित्र व चरित्र' या म्हणीप्रमाणे त्यांच्या प्रत्येक कर्मातून ईश्वरी ज्ञानाचा नशा दिसत असे. त्या जणू या सृष्टीवर अवतरित श्रीलक्ष्मी, श्रीदुर्गा वा श्रीसरस्वतीप्रमाणे अनुभवाला येत असत. कित्येकांना तसा साक्षात्कारही होत असे. त्या सर्व गुणांच्या मूर्ती दिसत आणि भासत असत. देहभानामुळे निर्मित सर्वप्रकारच्या भेदभावाच्या भिंती ओलांडून त्या सतत बेहदमध्ये विचरण करीत असत. त्यांचे चिंतन सदैव ईश्वरी ज्ञानाविषयी असे. त्यांनी कधीही व्यर्थ चिंतन केले नाही.

**२) मननात मग्नता :** मम्मा सर्वांना मातृवत स्नेह देऊन सहजच 'मन्मनाभव' स्थितीत स्थित करण्यात पारंगत होत्या. मुरलीतील महावाक्यांचे मनन मंथन करून त्यातून साररूपी लोणी काढण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांना शिवबाबांची ज्ञानमुरली अतिशय प्रिय होती. याचेच प्रतीक म्हणून भक्तिमार्गात राधा ही देखील मुरलीची दिवानी होती असे दर्शविण्यात येते.

**३) दर्शनात दिव्यता :** मातेश्वरींच्या दृष्टीत कमालीची दिव्यता होती. त्यांच्या संपर्कात येणारे स्त्री-पुरुष कोणत्याही जाती-धर्म-रंग-रूपाचे असोत, मम्मा त्यांच्या भृकुटीतील ज्योतिस्वरूप आत्म्यालाच पहात असत. त्या पंचतत्वांनी बनलेल्या नश्वर देहाला कधीही पहात नसत. त्यांची दिव्य दृष्टी ज्याच्यावर पडे, त्याच्यात दिव्य परिवर्तन सहजच होत असे व त्याचे जीवन दिव्य गुणांनी सुगंधित होत असे.

**४) कथनात सत्यता व स्पष्टता :** कोणत्याही कठीण व क्लिष्ट असणाऱ्या ज्ञानबिंदूस त्या सहज व सोप्या भाषेत परंतु सत्यतापूर्वक मांडत असत. सत्यतेची ऑथॉरिटी बनून त्या ईश्वरी ज्ञान निःसंकोचपणे आणि निश्चयपूर्वक वर्णन करीत असत. त्यामुळे प्रत्येक ज्ञानबिंदू एखाद्या बाणासारखा

ऐकणाऱ्याच्या हृदयाला भिडत असे.

**५) अध्ययनात तल्लीनता** : Student Life is the Best Life अर्थात विद्यार्थी जीवन हेच खरे आनंददायी श्रेष्ठ जीवन होय. या ब्रीदाचे मूर्तिमंत स्वरूप मातेश्वरींच्या ईश्वरी विद्यार्थी जीवनात दिसत असे. ईश्वरी महावाक्यांच्या अभ्यासात त्या देहभान विसरून जात असत. आत्म-अभिमानी स्थितीत स्थित होऊन, त्या प्रत्येक ज्ञानबिंदूचे स्वरूप बनल्या. दैवी गुणांच्या धारणेने त्यांचे जीवन दिव्यता-संपन्न बनले होते. त्यांना बघितल्यानंतर प्रत्येकाला त्याच्या इष्ट देवीचा साक्षात्कार होत असे.

**६) श्रवणात एकाग्रता** : जेव्हा शिवसागराच्या ज्ञानलहरी, ब्रह्मामुखकमलावाटे लहरत असत तेव्हा त्या एकटक, दत्तचित्त व स्थिरचित्त होऊन, एक-एक ज्ञानरत्न आपल्या बुद्धीरूपी तिजोरीत जपून ठेवित असत. एकाग्रतेच्या शक्तीमुळेच एकदा ऐकलेली अथवा वाचलेली ज्ञानमुरली त्या जशीच्या तशी स्पष्ट करीत असत.

**७) वर्णनात विवेकशीलता** : सृष्टिचक्राचे ज्ञान असो वा कर्माच्या गुह्यगतीचे ज्ञान असो, त्यांच्या विवेचनात नेहमी विवेकशीलता झळकत असे. पूर्णतः तर्कसंगत पुरावे दिल्याने परमात्म ज्ञानावर श्रोत्यांचा निश्चय बसत असे. प्रत्येकाच्या मनाला रुचेल व बुद्धीला पटेल असे ईश्वरी ज्ञानाचे विवेचन देणे, ही मातेश्वरींच्या सद्सद्विवेक बुद्धीचीच कमाल होती.

**८) मीलनात पावनता** : या कलियुगी तमोप्रधान दुनियेतील कोणीही पतित आत्मा जेव्हा मातेश्वरींना भेटत असे तेव्हा त्यांची दृष्टी पडताच तो तन व मनाच्या विकारी तापापासून मुक्त होऊन शीतलतेचा अनुभव करीत असे. त्यांच्या संपर्कात येणारी कामी, क्रोधी व्यक्ती पवित्रतेचा अनुभव करीत असे. या त्यांच्या पावनतेच्या दिव्य कर्तव्यामुळेच त्यांना पतितपावनी गंगा अथवा कलंक मिटविणाऱ्या महाकालीचे नाव देण्यात आले.

**९) आचरणात पवित्रता** : मातेश्वरी स्वतःला आत्मा राजा समजून, प्रत्येक इंद्रियावर नियंत्रण ठेऊनच आचरण करीत असत. नेत्रात निर्मळ दृष्टी, कानांनी ईश्वरी महावाक्यांचे श्रवण, मुखाने मधुर महावाक्यांचे उच्चारण, हातांनी यज्ञसेवेचे पुण्यकर्म आणि प्रत्येक श्वासात शिवबाबांची आठवण सामावलेली असे. त्यामुळेच त्यांच्या इंद्रियांना नेत्रकमल, मुखकमल, कर्णकमल, हस्तकमल, पादकमल अशी उपमा दिली जाते.

**१०) ग्रहण करताना गुणग्राहकता** : मातेश्वरी ज्यांच्याही संबंध-संपर्कात येत असत, त्यांच्यातील गुणांचा शोध घेत व ते गुण जसेच्या तसे जीवनात अंगिकारत. कोणी व्यक्ती असो वा प्रकृती, प्राणी असो वा पक्षी प्रत्येकाच्या गुण-विशेषतांचा अभ्यास करून, त्यांना आत्मसात करीत असत. त्याचप्रमाणे प्रत्येक ब्रह्मावत्साच्या सद्‌गुणांना पारखून ते यज्ञसेवेत लावून, प्रत्येकाला प्रोत्साहन देत असत.

**११) वर्तनात गंभीरता** : मातेश्वरींची मुख्य विशेषता होती ती म्हणजे त्यांच्या वर्तनातील गंभीरता व चेहऱ्यावर झळकणारे मंद हास्य. त्या केवळ आवश्यकतेनुसार अल्प बोल बोलत. त्यांच्या वर्तनात सदैव धीर गंभीरता दिसत असे. त्यामुळे त्या कोणत्याही समस्येचे सहज समाधान करीत असत. त्यांच्या या गंभीरतेमुळे त्या कुमारी असून मातेसमान परिपक्व दिसत.

**१२) संबोधनात सन्मान** : मातेश्वरी वार्तालाप करताना प्रत्येकाला सन्मान देत असत. जरी समोरची व्यक्ती त्यांच्या-पेक्षा वयाने लहान असली तरी त्या त्याच्याशी बोलताना अरे-कारे, तू-तू करण्याऐवजी नेहमी सन्मानयुक्त 'आपण' (आप) या शब्दाचा वापर करीत. कारण त्यांचे म्हणणे असे होते की दैहिक दृष्टीने जरी कोणी लहान-मोठा असला तरी देहातील गुणस्वरूप आत्मा सन्मानाचा अधिकारी आहे.

**१३) चाल-चलनमध्ये शालीनता** : खरे तर व्यक्तीचे चाल-चलन हाच त्याच्या व्यक्तिमत्वाचा खरा आरसा असतो. शालीनतेच्या स्वामीनी मातेश्वरी चार-चौघात आपल्या रॉयल (शालीन) चलनमुळे आगळा-वेगळ्या वाटत. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच दिव्य गुणांची झलक स्पष्ट दिसत असे. त्यामुळे त्या खरोखर रॉयल्टीची पर्सनॅलिटी होत्या.

**१४) अनुसरणात अचुकता** : परमसद्‌गुरु शिवबाबा व पिताश्री ब्रह्माबाबा यांच्या प्रत्येक आज्ञेचे त्यांनी अचूक पालन केले. 'सद्‌गुरुकी आज्ञा सिर माथे' अशी त्यांची मान्यता होती. त्यामुळे शिवबाबांच्या श्रीमताला पूर्णपणे फॉलो करणाऱ्या व ब्रह्माबाबांच्या आचरणाचे अनुसरण

करून त्यांना फॉलो करणाऱ्या, त्या खऱ्या अर्थी फॉलोअर (शिष्या) होत्या.

**१५) आज्ञापालनात तत्परता** : जेव्हा जेव्हा शिवबाबा व ब्रह्माबाबा स्वउन्नत्तीसाठी तसेच विश्वसेवेसाठी मातेश्वरींना आदेश देत, तेव्हा त्या तत्परतेने त्यांचे पालन करीत असत. रात्र असो वा दिवस, थंडी असो वा उकाडा, त्यांना दिलेल्या आज्ञेचे त्या पालन करीत असत. त्यात त्यांनी कधीही आळस वा दिरंगाई केली नाही.

**१६) अभिवादनात नम्रता** : ज्याप्रमाणे फळांनी बहरलेले झाड आपोआप झुकतं त्याप्रमाणे सर्वगुण संपन्न मातेश्वरी नम्रतापूर्वक वाकून अभिवादन करीत असत. अशाप्रकारच्या विनम्र अभिवादनाने प्रत्येक आत्मा सुखावत असे. त्यांच्या अतिथी सत्कारातील विनम्र अभिवादनामुळे पाहुण्यांच्या मनावर अमिट छाप पडत असे.

**१७) आदान-प्रदानात स्वच्छता** : दुसऱ्यांशी देवाण-घेवाण करताना मातेश्वरी खूपच बारीक स्वच्छता बाळगत. मनसा-वाचा-कर्मणा या तिन्हींमध्ये त्या कोणताही विकारी केर-कचरा येऊ देत नसत. ज्याप्रमाणे आपण फिल्टर करून मगच पाणी माठात भरतो त्याप्रमाणे दिव्य बुद्धीच्या चाळणीने फिल्टर केल्यानंतरच त्या गोष्टींना स्वीकारीत असत. ज्ञानदान करताना देखील त्यांनी कधीही मीपणा, अभिमान, संशय या गोष्टी येऊ दिल्या नाहीत.

**१८) पुरुषार्थात तीव्रता** : पुरुषार्थाची व्याख्या सांगताना मातेश्वरी म्हणत, 'तीव्र पुरुषार्थ म्हणजे एकदा झालेली चूक पुन्हा होऊ न देणे.' जो आपल्या हातून झालेल्या चुकीची पुनरावृत्ती करीत नाही, तोच खरा तीव्र पुरुषार्थी होय. मातेश्वरींची पुरुषार्थाची विशेषता ही होती की एकदा लक्षात आलेल्या चुकीची पुनरावृत्ती त्या कधीच होऊ देत नव्हत्या.

**१९) संकल्पात दृढता** : त्यांचे संकल्प हिमालयासम दृढ असत. मग ते दैवी गुणांच्या धारणेविषयी असोत किंवा सेवेविषयी असोत, जोपर्यंत संकल्प पूर्ण होत नसे तोपर्यंत त्या जीवापाड मेहनत करून, अवश्य पूर्ण करीत. दृढतारूपी गुरुकिल्लीने प्रत्येक कार्यात मातेश्वरी यशस्वी होत असत.

**२०) वाणीत मधुरता** : मातेश्वरींच्या प्रत्येक वचनात जणू साखर पेरलेली असे. त्यांची वाणी मधमाश्यांच्या पोळ्यातील टपकणाऱ्या मधाप्रमाणे अवीट गोडी देणारी जणू अमृतवाणीच होती. मितभाषी, सारगर्थित वाणी तसेच दुसऱ्याला आपलंसं करण्याची कला त्यांच्यात होती. कोणी कितीही मोठी चूक केली तरी त्या कधीही कटुवचनांनी त्याला न दुखावता, सदैव प्रेमानेच शिकवण देत. त्यामुळेच त्या जगत् अंबा (जगदंबा) बनल्या.

**२१) ज्ञानात गुह्यता व महीनता** : मातेश्वरी नेहमी ज्ञान-सागराच्या तळाशी जात असत. त्यामुळे ईश्वरी ज्ञानाच्या गुह्य रहस्यांना समजावून सांगण्यात त्यांचा हात कोणी धरू शकत नसे. विलक्षण बुद्धीमत्तेच्या बळावर ज्ञानाच्या एक-एक आवरणाची उकल करून त्यातील गुह्यता त्या स्पष्ट करून सांगत, म्हणूनच त्यांना विद्यादेवी सरस्वती असा गौरव प्राप्त झाला.

**२२) योगात निरंतरता** : परमात्मा शिवपित्याच्या निरंतर आठवणीत त्या मग्न असत. 'मनाची तार तुजसवे जोडली, लोकलाज मी जगाची सोडली' अशी होती त्यांची निरंतर योगाची अतूट धारणा. एकही क्षण परमात्म स्मृतीविना दवडणे त्यांना ठाऊक नव्हते. शिव ज्योतिवर फिदा झालेल्या पतंगा-प्रमाणे त्यांची स्थिती होती. 'माझे तर एक शिवबाबा, दुसरे कोणी नाही' हेच त्यांचे ब्रीद व मनाच्या प्रितीचे गीत होते.

**२३) धारणेत संपन्नता** : मातेश्वरी दिव्य गुणांच्या धारणेने सर्वगुण संपन्न बनल्या. त्यांची बुद्धीरूपी तिजोरी सर्व ज्ञान रत्नांनी भरपूर होती तसेच व्यवहारात त्या १६ कला संपूर्ण होत्या. मन, वचन, कर्मात, ज्ञान, गुण व शक्तींनी संपन्न असल्यामुळेच त्या श्रीलक्ष्मी, दुर्गा, काली, सरस्वती, संतोषी, उमा, भवानी व जगदंबा या अष्टदेवींच्या रूपात पुजल्या जातात.

**२४) सेवेत अथकता** : पिताश्री ब्रह्माबाबा जेव्हा त्यांना विश्वसेवेचा एखादा आदेश देत असत तेव्हा त्या तत्क्षणी 'हाँ जी बाबा' असे म्हणत व त्या सेवेत रुजू होत. त्यांना कोणी कधीही भेटण्यासाठी आले तर अगत्याने स्वागत करून, त्याची आत्मिक सेवा करीत. आळस हा शब्द जणू त्यांच्या डिक्शनरीतच नव्हता. सर्व यज्ञवत्सांची तसेच आपल्या भक्तांची सेवा करण्याचा एकच ध्यास त्यांच्या

▶ पान क्र.२९ वर

# हंससमान सदैव गुणमोती ग्रहण करा

***ब्र.कु.बालुभाई, शांतीवन (आबूरोड).***

विश्वात कोणतीही व्यक्ती केवळ धन, संपत्ती, वैभव यांच्या प्राप्तीने महान बनू शकत नाही. कारण या सर्व गोष्टी अल्पकालीन तसेच परिवर्तनशील आहेत. वस्तुतः पाहू गेल्यास ही सर्व शरीर निर्वाहाची साधने आहेत. यांची प्राप्ती हे जीवनाचे अंतिम लक्ष्य नव्हे. **आपल्या जीवनात सद्गुणांचा विकास करणे, महान चरित्रवान बनणे, मनुष्या-पासून देवता बनणे हे ध्येय असायला पाहिजे. या ध्येयाचे फळ म्हणून आपल्या हातून चांगली कर्मे होत राहतील, दैवी गुणांची प्राप्ती होत जाईल व चारित्र्य महान बनत जाईल.**

आजवर इतिहासात जे थोर स्त्री-पुरुष होऊन गेले. उदाहरणार्थ, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, मदर टेरेसा, प्रजापिता ब्रह्माबाबा, माता सरस्वती, दादी प्रकाशमणी. त्यांच्या चरित्रांचे अवलोकन केले तर आपल्या लक्षात येईल की त्यांचे जीवन त्याग, तपस्या व सेवेचे मूर्तीमंत प्रतीक होते. त्यांच्याकडे धनाची श्रीमंती कमी-अधिक प्रमाणात होती परंतु मुख्य होती मनाची श्रीमंती. या श्रीमंतीच्या जोरावरच ते अजरामर झाले. याउलट सिकंदर, नेपोलियन इत्यादी पराक्रमी पुरुषांनी बाहुबलाच्या आधारे अनेक देश जिंकले परंतु तेथील लोकांची मने ते कधीच जिंकू शकले नाहीत. तात्पर्य म्हणजे सत्य, अहिंसा, प्रेम, दया, करुणा, परोपकार यासारख्या दैवी गुणांच्या शक्तीनेच लोकांच्या मनावर राज्य करता येते.

रामायण-महाभारतात वर्णित राम आणि रावण, पांडव आणि कौरव, श्रीकृष्ण आणि कंस हे सर्व गुण व अवगुणांचे प्रतीक आहेत. अवगुणांमध्ये ज्यांनी गुण शोधले, अकल्या-णामध्ये ज्यांनी कल्याण शोधले, अपकार करणाऱ्यावरही ज्यांनी उपकाराची भावना ठेवली, आपल्या मारेकऱ्यासाठी सुद्धा ज्यांनी क्षमा व दयेचा संदेश दिला अशा महान विभूती सदैव सर्वांसाठी माननीय, पूजनीय व वंदनीय आहेत. **अशा-प्रकारचे आपले जीवन बनवायचे असेल तर त्यासाठी आवश्यक दैवी गुण आहे गुणग्राहकता. या गुणाचे वैशिष्ट्य म्हणजे हा गुण इतर सर्व गुणांच्या धारणेसाठी योग्य प्रकारची भूमी तयार करतो. जर भूमी ठीक नसेल तर कितीही चांगल बीज पेरलं, कितीही पाणी दिलं तरी ते बीज फळ देणार नाही.** म्हणून प्रत्येकाने हा दृढ संकल्प करायला हवा की गुण कुठेही असोत, कोणतेही असोत ते मला अवश्य धारण करायचे आहेत व दुर्गुणरूपी घाण काढून टाकायची आहे. या अनुषंगाने एक छोटीशी गोष्ट येथे नमूद करावीशी वाटते.

एकदा एक शिष्य आपली सुट्टी संपल्यानंतर आपल्या गुरुंच्या आश्रमाकडे जायला निघाला. पुढे चालता-चालता त्याला तहान लागली. म्हणून त्याने रस्त्यावरील एका विहिरीतून बादलीने पाणी काढले. पाणी पिऊन झाल्यावर त्याचे मन तृप्त झाले. त्याला खूपच तहान लागलेली असल्याने, त्याला ते पाणी फारच चांगले वाटले होते. त्यामुळे त्याच्या मनात विचार आला की हे पाणी आपल्या गुरुंसाठी घेऊन जाऊ या. त्यानुसार त्याने आपल्या कमंडलूत पाणी भरले. आश्रमात गेल्यावर त्याने आपल्या गुरुंचे दर्शन घेतले व आपल्या सोबत आणलेले पाणी त्याने गुरुंना दिले. हे पाणी खूपच चांगले असल्याने मी आपल्यासाठी आणले असल्याचे, तो म्हणाला. आपल्या शिष्याच्या प्रेमामुळे त्यांनी ते मोठ्या आनंदाने प्रशान केले व त्याचे मनापासून कौतुक केले. नंतर तो तेथून निघून गेला.

गुरुंच्या शेजारी बसलेला दुसरा एक शिष्य हे सर्व बघत होता. त्याने गुरुंना विचारले की त्या पाण्यात एवढं काय विशेष आहे, ज्यामुळे आपण त्याचे खूप कौतुक केले? तेव्हा गुरूंनी त्याला कमंडलूतील उरलेले पाणी पिण्यास सांगितले. त्या पाण्याचा एक घोट घेताच तो शिष्य म्हणाला, 'हे पाणी किती बेचव आहे, तरीसुद्धा आपण त्या शिष्याची एवढी प्रशंसा का केली?' तेव्हा गुरूंनी शिष्याला समजावून सांगितले की बेटा, गोडवा त्या पाण्यामध्ये नाही म्हणून काय झाले. परंतु त्या शिष्याच्या मनात गुरुविषयी जे प्रेम दडलेले आहे ते मी बघितले. मलासुद्धा ते पाणी बेचवच लागले परंतु तसे सांगून मी त्या शिष्याला दुःखी करू इच्छित नव्हतो. त्यामुळे सदैव लक्षात ठेव की ३६ प्रकारचे

स्वादिष्ट भोजन असले व त्यात जर प्रेमाचा गोडवा नसेल तर ते स्वादिष्ट लागणार नाही. त्यापेक्षा प्रेमाने भरपूर असलेली दाळ-रोटी कितीतरी पटीने अधिक रुचकर लागते.

**तात्पर्य म्हणजे दुसऱ्याला दुःख देणाऱ्या गोष्टी आपण टाळू शकतो. तसेच वाईटातून चांगले शोधू शकतो. हंस जसा मोती टिपतो किंवा दूध तेवढे घेऊन पाणी सोडून देतो. तसे आपणही गुणमोती ग्रहण करायला हवेत आणि दुर्गुण सोडावयास हवेत.** जगात आपल्या संबंध-संपर्कात अनेक व्यक्ती येत असतात. त्या प्रत्येक व्यक्तीत जे गुण असतात तेच जर आपण पाहिले व एक-एक व्यक्तीकडून एक-एक गुण जरी ग्रहण करीत गेलो तरी आपण सहजच सर्वगुणसंपन्न होऊ शकू.

तसेच एक दुसऱ्याची कमी, कमजोरी न बघता, गुणग्राहक दृष्टी ठेवली तर आपण लौकिक-अलौकिक दोन्ही संबंधात सफलतापूर्वक चालू शकू. आपण पूर्वज आत्मा आहोत. जर आपण दोष दृष्टी ठेवली तर कमजोर आत्मा कुठे जाईल ? त्यामुळे दुसऱ्याची कमजोरी ही कमजोरी न समजता, ती कशी भरून काढता येईल, यासाठी मदतगार बना. जो कमजोर आहे त्याला आधार द्या. जो खाली पडला आहे, त्याला उठवणे हीच तर खरी कमाल आहे. जो पुढे आहे, त्याला पुढे करण्यात कमाल ती कुठली ? **त्यामुळे कोणालाही कमजोर समजू नका व कोणाचीही निंदा करू नका. प्रत्येकातील गुण तेवढे पाहा व ते कसे वृद्धींगत होतील यासाठी आवश्यक सहयोग द्या. मुख्य म्हणजे दोषदृष्टीचा त्याग करा. सारांशाने असे म्हणता येईल -**

**स्वये गुणवान होऊनी, सकळाचे गुण ते पहावे।**
**आत्मा भाऊ समजून, दोष ध्यानी न धरावे।।**

---

▶ पान क्र. १२ वरून

आत्म्यांविषयी दयाभाव असल्याने कुणाविषयी कधीही जरासुद्धा घृणाभाव न ठेवता, सदा शुभभाव व भावना बाळगेल.

### ❒ अमृतवेळेला दिलखुश मिठाई खा

रोज अमृतवेळेला दिलखुश मिठाई खा अर्थात आपल्या मनाला खुशीने भरपूर करा म्हणजे संपूर्ण दिवस स्वतः तर खुशीत रहालच परंतु आपल्याला पाहून दुसऱ्यांनाही खुशी होईल. कारण खुशीचा खुराक असा आहे की त्याच्यापुढे कुठलीही परिस्थिती ही अगदी लहान वाटते. पर्वताएवढी समस्या देखील मोहरीप्रमाणे छोटीसी वाटते. तात्पर्य म्हणजे इतकी ताकद या खुराकामध्ये आहे. **त्यामुळे रोज दिलखुश मिठाई खा अर्थात दिल (मन) सदा खुश राहिले पाहिजे. 'पाना था सो पा लिया' हे आपल्या स्थितीचे गायन आहे. वर्तमान ब्राह्मण जीवनात परमात्म खुशीचा, अतींद्रिय सुखाचा अनुभव करा. देवी-देवतांना सुद्धा तो होणार नाही.** त्यामुळे रोज असे समजा की आज विशेष खुशीचा दिवस आहे. स्वतःही खुशीत रहा व दुसऱ्यांनाही खुशी वाटा. आपण जितकी खुशी दुसऱ्यांना वाटू तितकी ती वाढत जाईल. खुशीने परिपूर्ण चेहरा सर्वांनाच आवडतो. दुःख-अशांतीपूर्ण चेहरा कोणालाच आवडत नाही. जर तो कोणालाच आवडत नाही तर आपल्यालाही आवडता कामा नये. तात्पर्य म्हणजे रोज अमृतवेळेला दिलखुश मिठाई खा व दिवसभर खुशीच्या चेहऱ्याने सेवा करीत रहा.

### ❒ अमृतवेळेचा योगाभ्यास हाच मुख्य पुरुषार्थ

योगेश्वर शिवबाबा फक्त आपल्याला अमृतवेळेला उठून १ तास प्रेमपूर्वक आठवण करायला सांगतात, स्वदर्शनचक्र फिरवायला सांगतात. वास्तविक हा काही मेहनतीचा पुरुषार्थ नाही. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आत्म्याला पावन बनविण्याचा दुसरा कुठलाही उपाय नाही. परंतु काही जण कारणे-अकारणे अमृतवेळेला उठत नाहीत. त्यामुळे त्यांच्यात धारणाही होत नाही. म्हणूनच काहीही करून अमृतवेळेला उठण्याची सवय जर त्यांनी लावली तर ते सर्व्हिसबुल अवश्य बनतील. कित्येक जण सेवेसाठी रात्री जागतात. त्यामुळे त्यांचा अमृतवेळेचा योग मिस होतो. एकीकडे ते सेवा करून जमा करतात, दुसरीकडे अमृतवेळेचा योग मिस करून, गमावतात. त्यामुळे त्यांचे एक्स्ट्रा जमा होत नाही. काहीजण नेमीनाथ बनून अमृतवेळेला उठतात परंतु बराचसा वेळ ते झुटके खात असतात. या सर्व गोष्टी सर्वथा अनुचित आहेत. **वास्तविक अमृतवेळा ही वरदानी वेला आहे. तिचा पुरेपुर फायदा घेऊन रोज आपल्या सद्भाग्यात वृद्धी करणाराच खऱ्या अर्थी पद्मापद्म भाग्यशाली बनतो. याचेच गायन आहे, 'जागत है सो पावत है, सोवत है सो खोवत है।'**

# आत्म्याचे औषधशास्त्र

***-- ब्र.कु.डॉ.दिलीप कौंडिण्य, घोडपदेव, मुंबई.***

शीर्षक वाचून दचकला असाल. मनात प्रश्नांची गर्दी झाली असेल. डॉक्टर असून देखील काय भलतेच लिहित आहात? परमात्मा काय, आत्मा काय, भूत-पिशाच्च काय, विज्ञानाने अद्याप त्यांचे अस्तित्व सिद्ध केलेले नाही. सर जे.जे. रुग्णालयासारख्या जगप्रसिद्ध रुग्णालयात काम करता आणि अशा बुरसट अंधविश्वासाला मान्यता देता? खरी गोम येथेच आहे. आम्ही भारतीय, इंग्रजांनी तसे काही सांगितल्याशिवाय आपल्याच अतिशय पुरातन आध्यात्मिक ज्ञानावर देखील विश्वास ठेवत नाही. नशीब भारतीय लोक अजून असे म्हणत नाहीत की आधी डी.एन्.ए. टेस्ट करून सिद्ध करा, नाहीतर तुम्हाला बाप मानणार नाही. **आज सर्व आत्म्यांचा परमपिता शिवबाबा, साक्षात धरातलावर येऊन त्यांची ईश्वरीय वाक्ये 'मुरली'द्वारे स्वतःचा परिचय करून देत आहेत पण साक्षात परमेश्वरा-वर देखील विश्वास नाही.** तसेच रुहानी डी.एन्.ए. टेस्ट करणे अद्याप प्रगत विज्ञानाला जमलेले नाही, त्यामुळेच विश्वविख्यात आईनस्टाईन म्हणतात, 'विज्ञान एक बाळ आहे. आध्यात्मिकता त्याच्या आवाक्यापलिकडे आहे.'

डॉ.हर्बर बेन्सन, अमेरिकन हृदयरोगतज्ज्ञ यांनी बहुधा भारतीय अध्यात्म वाचून जगातील पहिली-वहिली 'इन्स्टिट्यूट ऑफ बॉडी मेडिसिन'ची स्थापना सन १९७० साली केली. आज अमेरिकेत एकंदर ३२ अशा संस्था आहेत. डॉ.बिश्स् केंद्रिय स्वास्थ्य मंत्रालय, यांच्या प्रयत्नांमुळे जागतिक आरोग्य संघटनेद्वारे संपूर्ण स्वास्थ्याच्या परिभाषेत आध्यात्मिक स्वास्थ्याचा समावेश सन १९९४ साली केला. **त्यानंतर सन २००१ मध्ये अमेरिकेने प्रथम पाऊल उचलले आणि वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये आत्म्याचे औषधशास्त्र (स्पिरीच्युअल मेडिसिन) या विषयाचा समावेश केला. त्यानंतर अन्य प्रगत देशांनी अमेरिकेचे अनुकरण केले. पण माझा भारत देश महान इतक्या लवकर काही करायचे नाही असा हट्ट धरून आहे.** इंडियन सायकेट्री सोसायटीचे बी.के.डॉ.अवधेश शर्मा यांनी आत्म्याचे औषधशास्त्र कमीत कमी पदवीपूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमात समाविष्ट व्हावे असा जोरदार प्रयत्न केला पण अद्यापपावेतो यश आलेले नाही. मी जगप्रसिद्ध हॅफकीन इन्स्टिट्यूट परेल, मुंबई; महात्मा गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस्, सेवाग्राम; शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जबलपूर; एन्.के.पी. साळवे वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर इत्यादी ठिकाणी याविषयी प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. शेवटी एम्.यू. एच्.एस्., नाशिक यांनी अत्यंत दूरदृष्टी ठेऊन माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली. वैद्यकीय क्षेत्रात सतत घसरत जाणारी सामाजिक व नैतिक मूल्ये व पदवी-पूर्व वैद्यकीय अभ्यासक्रमात आध्यात्मिक औषधशास्त्राचा समावेश या बाबींवर निर्णय घ्यायचा होता. सदर समितीची एक बैठक २८ मे २०१३ रोजी झाली. त्यानंतर प्रशासकीय अडथळ्यांची मालिका सुरू झाली. **त्यामुळे गौतम बुद्धांची विपश्यना, जैन धर्मियांचे प्रेक्षाध्यान, जापनीझ् झेन मेडिटेशन व ब्रह्माकुमारीज् या विश्वव्यापी संस्थेद्वारा मोफत शिकविला जाणारा 'राजयोग' हे आत्म्याकरिता औषधे व टॉनिक आहे, ही महत्वाची माहिती नवोदित तरूण डॉक्टरांना अभ्यासक्रमाद्वारे उपलब्ध झालेली नाही, हे महाराष्ट्राचे व पर्यायाने भारत देशाचे फार मोठे दुर्दैव आहे.**

आता आत्म्याच्या औषधशास्त्राविषयी माहिती घेणे का आत्यंतिक गरजेचे झालेले आहे ते पाहूया. हिप्पोक्रॅटिस्, आधुनिक वैद्यशास्त्राचे पिताश्री, यांनी फार वर्षापूर्वी ताकीद दिली होती की आज उपचार करताना डॉक्टर जी एक फार घोडचूक करीत आहेत ती म्हणजे शरीराबरोबरच आत्म्याचा ते उपचार करीत नाहीत. भारतात सदर घोडचूक सुधारण्याचा प्रयत्न अद्याप होत नाही. पाश्चिमात्यांनी सदर चूक तर सुधारलीच आहे पण आत्म्यावर संशोधन देखील सुरू केले आहे. याचा परिपाक म्हणजे वैद्यकीय शास्त्राच्या दोन अति अद्ययावत शाखांचा उदय झाला आहे. सायको-न्युरो-एन्डोक्रायनो इम्युनॉकॉलॉजी आणि सायको-ऑन्कॉलॉजी. यात चालणारे संशोधन असे सिद्ध

करीत आहे की आत्म्याची शक्ती म्हणजेच मनाची शक्ती ध्यान-धारणेद्वारा वाढविल्यास कॅन्सरसारखा असाध्य रोग देखील पूर्णपणे बरा होतो. म्हणजेच आज जे मानवी जीवन रखडत-रखडत पोळ्या कमी, गोळ्या जास्त याप्रमाणे चालले आहे ते पूर्णपणे बदलून जाईल. जेफ्रे श्वार्टज्, कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटी आणि डॉ. रिचर्ड डेव्हीडसन यांनी विपश्यनावर सखोल संशोधन केले व स्वास्थ्याकरिता त्याची उपयुक्ता सिद्ध केली. डॉ. डेव्हीडसन यांनी तर ध्यान-धारणेला माईण्डफुलनेस मेडिटेशन किंवा मेन्टल सायलेन्स टाईप मेडिटेशन असे नाव दिले. या ध्यान-धारणेच्या प्रकारात संपूर्ण अंतरमौनाचा (इनर सायकेन्सचा) अनुभव येतो. मन व बुद्धी एकाग्रचित्त स्थितीत कार्य करू लागतात. राजसिक-तामसिक स्थितींच्या मध्ये माकडासारखे वर-खाली उड्या घेणारे मन सात्विक स्थितीत स्थिर होते. तणावाचे स्वास्थ्याकरिता हानिकारक स्त्राव बंद होतात. उर्जा आणि झीज भरून काढणारे संजीवनी स्त्राव निर्माण होतात जे असाध्य रोगांना देखील बरे करतात. **रोग होण्याआधीच नियमितपणे ध्यान-धारणा केल्यास मनुष्य अगदी शेवटच्या श्वासापर्यंत शांत, आनंदी, उत्साही आणि तरुणांना लाजवेल इतकी उर्जा व शक्ती राखू शकतो असे प्रमाणित झालेले आहे.**

आता आपण पाहूया, असाध्य रोग म्हणजे कोणते? यांना तणावामुळे होणारे आधुनिक जीवनशैलीचे आजार असे म्हणतात. अगदी अलिकडे या प्रकारच्या व्याधींना एक नवीन नाव देण्यात आलेले आहे, एन्. सी. डी. किंवा नॉनइन्फेक्शियस क्रॉनिक डिसीजेस्. आज एन. सी. डी. चे प्रमाण तरुणांमध्ये देखील इतक्या प्रचंड प्रमाणात आणि झपाट्याने वाढलेले आहे त्यामुळे महाराष्ट्राच्या आरोग्य संचालनालयात एन्. सी. डी. चा एक नवीन विभाग निर्माण करण्यात आलेला आहे. एन्. सी. डी. त कोणत्या आजारांचा समावेश आहे? डिप्रेशन, डायबेटीस्, डिमोन्शिया, पार्किन-सोनीझम, मस्क्युकोस्केलेटन डिस्ट्रॉफी, लहान मुलांत होणारा अटेन्शन् डिफिशियन्सी, हायपर-ॲक्टीव डिसीज्, अस्थमा, आर्थरायटीस, ॲलर्जी, ऑटो इम्युन डिसीजेस्, कॅन्सर व व्यसन इत्यादींचा एन. सी. डी. त समावेश होतो. ताण-तणाव, वैफल्य इत्यादी आपल्या मनात म्हणजे आत्म्याच्या एका भागात निर्माण होतात. पण एक देखील मनोपचार-केंद्रीत उपचार पद्धती अद्याप सर्व संमत नाही हे अतिशय दुर्दैवाचे आहे. या उलट कार्डियोसेन्ट्रीक, ओबेसिटी सेन्ट्रीक, डायबेटोसेन्ट्रीक आणि केन्डोमसेन्ट्रीक उपचार पद्धतींवर करोडो रुपये खर्च होत आहेत; याचे मुख्य कारण आपले सर्व लक्ष शरीरावर आहे, आत्म्यावर नाही. **पाच हजार वर्ष जुनी भगवद्गीता सांगते; जोपर्यंत आपण हे समजत नाही की मी एक अजर, अमर, अविनाशी आत्मा आहे, हे शरीर नव्हे. तोपर्यंत माणसांच्या दुःख, यातना आणि व्याधी दूर होणार नाहीत.**

आज पाश्चिमात्य मनोपचार तज्ज्ञ भगवद्गीतेला प्रभावी मनोपचाराची विधी सांगणारा ग्रंथ मानतात कारण तिथे डिप्रेशनग्रासित अर्जुनाला मनःशक्ती देऊन पुन्हा महावीरा-सारखे युद्ध करायला सज्ज केले गेले. आज आपण सर्व संसाराच्या चक्रव्यूहात अडकलेले अभिमन्यू आहोत. 'राजयोगाद्वारे' साक्षात परमेश्वराचे सहाय्य आणि आत्म्याचे टॉनिक उपलब्ध होते. परमेश्वराचा हात धरल्यास आपण देखील महावीर अर्जुन होऊ शकतो. तसेच माझे स्वतःचे सात असाध्य रोग दूर झालेले आहेत. आज १३० देशातील ८,५०० योग केंद्रात राजयोग अगदी फुकट, मोफत शिकविला जातो. 'फुकट ते पौष्टिक' असा आपण महाराष्ट्रीयन लोकांचा खाक्याच आहे. सबब प्रयोग तर करून बघा. आपोआप समजून येईल. ❖❖❖

---

▶ पान क्र. २५ वरून

मनी असे. 'जो करना है, वह अब कर लो, अब नही तो कब नही।' हे त्यांचे घोषवाक्य होते.

**सारांश म्हणजे ज्याप्रमाणे २४ कॅरेटचे सोनं हे खर सोनं मानलं जातं त्याप्रमाणे मातेश्वरींच्या वरील २४ विशेषता धारण केल्याने, आपलेही जीवन २४ कॅरट सोन्याप्रमाणे बनेल. मग जीवनात कितीही अग्निपरीक्षा आल्या तरी ते सदैव चमकतच राहिल. शेवटी प्रेरणामूर्त, दिव्य गुणमूर्त, परमपावन मातेश्वरींना त्यांच्या ४९ व्या दिव्य स्मृतीदिनानिमित्त (२४ जून २०१४ रोजी) आम्हा ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम!**

**हे जगदंबे, तुज नमो! हे विद्यादेवी, तुज नमो!**

# पतंग उडवू चला मुलांनो,
# पतंग उडवू चला...

*-- ब्र.कु.ज्ञानेश्वर, धुळे.*

आपण सर्वजण परमपिता शिव परमात्म्याची आत्मारूपी मुले आहोत. परमात्मा पिता या सृष्टीवर जेव्हा अवतरित होतो, तेव्हाच आत्मारूपी मुले पतंग उडवितात अर्थात आत्मा उडती कला अनुभव करतो. उडता पतंग पाहून सर्वांना अतिशय आनंद होतो व पहाणाऱ्याला वाटते की आपणही असे स्वच्छंद उडावे. याचेच गायन आहे, 'उडती कला तेरे बहाने सर्व का भला'. संगमयुगातच आपण उडती कला अनुभवू शकतो कारण **ज्ञानसागर परमात्मा आपल्याला हे समजावून सांगतात, 'मुलांनो, तुम्ही देह नसून आत्मा आहात. त्यामुळे देहअभिमान सोडा आणि आत्मअभिमानी बना म्हणजे तुम्हाला उडती कला अनुभवाला येईल. देहअभिमान हा तर चिखल वा दलदल आहे त्यातून बाहेर पडण्यासाठी आत्मअभिमानी बना.'**

पतंग उडवताना सर्वप्रथम हलका परंतु मजबूत असा एक पतंग लागतो. दुसरी गोष्ट आवश्यक असते ती म्हणजे मांजा (पक्का धागा) व तिसरी गोष्ट पतंग उडविण्याची कला. या तिन्ही गोष्टीतही आध्यात्मिक ज्ञान सामावलेले आहे. **हलका पतंग आहे आपल्या निराकारी स्थितीचे प्रतीक. निराकारी स्थिती ही डबल लाइट असल्यामुळे उडती कला अनुभवाला येऊ शकते. त्यानंतर दुसरी गोष्ट आहे पक्का धागा अर्थात निर्विकारी वा पवित्र स्थिती.** आत्म्यामध्ये पवित्रतेची धारणा जितकी पक्की असेल तितका आत्मारूपी पतंग उडू शकतो. त्याला माया कापू शकत नाही. पवित्रतेचा धागा जर कच्चा असेल तर दुसरे उडणारे मायारूपी पतंग आपला मांजा सहज कापू शकतात कारण पतंगाचा खेळ अधिक रोमांचक वाटतो तो पतंगांच्या कापाकापीने. त्यामुळे आपला धागा अन्य कोणी कापू नये यासाठी पवित्रतेची धारणा पक्की हवी. **तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पतंग उडविण्याची कला. आकाशात आपण पतंग उडवित असताना तो दुसऱ्या उडणाऱ्या पतंगांपासून सुरक्षित कसा राहिल, झाडावर वगैरे अडकणार नाही, या गोष्टींकडे देखील सतत लक्ष द्यावे लागते. त्याचबरोबर उंच उडणारा पतंग हातात सावरतांना शक्ती देखील लागते. हे प्रतीक आहे निरहंकारी स्थितीचे.** बरेच जण पतंग उडवताना दुसऱ्यांचे पतंग कापण्यातच आनंद मानत असतात कारण त्यांची अशी इच्छा असते की आपलाच एकट्याचा पतंग आकाशात उंच उडत रहावा. परंतु बऱ्याचदा होतं काय की त्याचाच पतंगाचा धागा तुटतो व त्याचा पतंग कुठेतरी जाऊन खाली पडतो. कित्येकदा उंच उडणारा पतंग दुसऱ्यांना पहावत नाही म्हणून दुसरेही त्याला कापण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा परिस्थितीत आपला पतंग सदैव सुरक्षितपणे आकाशात उंच उडत रहावा यासाठी निरहंकारी बनण्याची आवश्यकता आहे. जो निरहंकारी आहे तो आपल्या पतंगाची दोर परमात्मा शिव पित्याच्या हाती सुपुर्द करतो व साक्षी, द्रष्टा बनून सदैव उडती कला अनुभव करतो. याचेच गायन आहे, 'शिवबाबा भोलानाथ, मेरी डोरी तेरे हाथ'. **अशा-प्रकारे जी आत्मारूपी मुले निराकारी, निर्विकारी व निरहंकारी स्थितीत राहून सदैव उडती कला अनुभव करतात, तीच मुले परमात्म प्रत्यक्षतेसाठी निमित्त बनतात.** त्यांची उच्च स्थिती पाहून, त्यांच्यातच अन्य परमात्म्याचे रूप पाहतात. याच आशयाच्या पुढील दोन ओळी सदैव लक्षात ठेवा,

**ज्याशी अहंकारिता नाही, शिवबाबा वसे त्याचे हृदयी।**
**ज्ञानी म्हणे सांगो किती, त्याची भगवंताच्या मूर्ती।।**

विशेष मकर संक्रांतीला सर्वजण पतंग उडवितात. यातही आध्यात्मिक रहस्य सामावलेले आहे. मकर संक्रांतीपासून दिवस मोठा-मोठा होत जातो. दिवस मोठा होणे अर्थात ज्ञान-प्रकाश मोठ्या प्रमाणात पसरत जाणे. **संगमयुगातच अशाप्रकारचे संक्रमण अर्थात परिवर्तन होत जाते म्हणूनच मकर संक्रांतीला मोठ्या आनंदाने व उत्साहाने लहान-मोठे सर्वजण पतंग उडवितात. आपणही त्यामागील रहस्य लक्षात घेऊन सर्वांना पतंग उडवायला बोलवू या,** 'पतंग उडवू चला...'

❖❖❖



# श्रावण बाळासारखी मातापित्याची सेवा अवश्य करावी

(अनुभव)

ब्र.कु.बापूभाई, कांडगाव (कोल्हापूर).

माझा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कांडगाव येथे दिनांक ५/५/१९५५ रोजी एका साधारण कुटुंबात झाला. घरची परिस्थिती जेमतेम असल्याने दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून, मी एस्.एस्.सी. पर्यंत शिकलो. त्यानंतर आय.टी.आय.चा कोर्स पूर्ण केला. परंतु शरीर प्रकृती चांगली असल्याने, कुस्तीमध्ये बराच नावलौकिक मिळवला होता. हायस्कूल-मध्ये शिकत असताना धावणे, रस्सीखेच, कबड्डी अशा खेळातून चांगले नंबर मिळवले होते. याचबरोबर मला ईश्वराची भक्ती करायला आवडत असे. त्यामुळे गावातील एका गणेश मंडळाचा मी पुढारी होतो. तेथे एकदा एका ब्रह्मावत्साने येऊन मला ब्रह्माकुमारी संस्थेचा परिचय दिला आणि त्या परिचयाने माझे जीवनच पूर्णतः बदलून गेले. मी रोज १५ किलोमीटर अंतरावरून सायकलीने सेंटरला येऊन कोर्स पूर्ण केला.

पुढे अचानक सन १९९० मध्ये माझ्या वडिलांनी देहत्याग केला. त्यामुळे घराची सर्व जबाबदारी माझ्यावर पडली. लवकरच मला एका साखर कारखान्यात नोकरी मिळाली, परंतु तेथेही माझे दुर्दैव म्हणजे मला केवळ तीन महिन्यात नोकरीवरून कमी करण्यात आले. नंतर मला सेंटरच्या दीदींनी दुधाचा धंदा करण्याविषयी सल्ला दिला. त्याचबरोबर एका अलौकिक भाईंनी मला दुधाचा व्यवसाय शिकवला. त्यानुसार मी दुधाचा व्यवसाय सुरू केला. त्यात माझा चांगलाच जम बसला. मी मोठ्या आनंदाने अलौकिक जीवन जगू लागलो.

परंतु काही काळानंतर माझ्या आईने माझ्या लग्नाचा हट्ट धरला. मी मात्र त्यासाठी तयार नव्हतो. त्यामुळे तीने मला बराच मानसिक त्रास दिला. **तेव्हा मला सेवा-केंद्रातील बहिणींनी खूप सहयोग दिला. सुमारे सहा वर्षे मी रोज दुपारी सेवाकेंद्रात भोजन करीत असे आणि रात्रीच्या वेळी दूध पिऊन झोपत असे. या काळात मी माझ्या समस्या निवारण्यासाठी खूप तपस्या केली. त्यावेळेस मला शिवबाबांकडून खूप खूप मदत मिळाली**. त्यातील एक विशेष अनुभव येथे मला नमूद करावासा वाटतो.

एकदा शेतात विहीर खोदून झाली होती परंतु बांधकामा-साठी कॉन्ट्रॅक्टर मिळत नव्हता. कसाबसा एक कॉन्ट्रॅक्टर मिळाला परंतु त्याने १ लाख ६० हजार रुपये खर्च येईल, असे सांगितले. ती रक्कम मला खूपच जास्त वाटली म्हणून ती गोष्ट मी शिवबाबांवर सोपवली. दुसऱ्या दिवशी (२३ मे २०११ रोजी) मला शिवबाबांनी सकाळी योगामध्ये एका व्यक्तीचा चेहरा दाखवला व त्याला जाऊन भेट असे सांगितले. त्याप्रमाणे मी त्या व्यक्तीकडे गेलो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती व्यक्ती माझीच वाट पहात होती. ती व्यक्ती लगेचच कामाला तयार झाली व मला म्हणाली तुम्ही उद्या सामान मागवा. परवापासून विहीरीचे बांधकाम सुरू करूया. खरोखरच त्या व्यक्तीने सात दिवसात विहीरीचे बांधकाम पूर्ण केले व तेही फक्त ८० हजार रुपयात. अशा अनेक प्रसंगी मी प्राणेश्वर शिवबाबांच्या मदतीचा अनुभव केला.

एकदा मी असाच रात्रीच्या वेळी शेतावर काम करीत होतो. रात्रीचे दोन वाजले होते. मी उसाला पाणी देत होतो. अचानक भीतीदायक आवाज माझ्या कानावर आला. त्यामुळे मी घाबरून गेलो. पण लगेचच दुसरा एक आवाज आला की 'तू घाबरू नकोस. मी तुझ्यासोबत आहे.' आणि खरोखरच मला एक सफेद प्रकाश दिसला. त्यामुळे नंतर कधीच मला रात्री-अपरात्री शेतात गेल्यावर भीती वाटली नाही.

पुढे माझा दुग्ध व्यवसाय सांभाळून, मी माझा बराच वेळ ईश्वरी सेवेत सफल करू लागलो. माझी शरीरयष्टी इतकी सुदृढ होती की भरलेले दोन गॅस सिलेंडर दोन खांद्यावर घेऊन, तीन मजले मी सहज व पटकन चढू शकत होतो. पण पुढे ड्रामा असा घडला की अचानकपणे माझ्या आईची तब्येत खूपच बिघडली, तिची स्मृती काही अंशी नष्ट झाली. त्यामुळे तिची सेवा मला करावी लागली. मी ती मोठ्या प्रेमाने केली. आईला उचलून पाटावर बसवणे, तीचे दात घासणे, तिला स्नान घालणे, तीचे केस विंचरणे, ही सेवा

श्रावण बाळाप्रमाणे मी अगदी पूर्ण श्रद्धेने केली. तिची पचन-क्रिया बिघडली असल्याने, चहा बिस्कीट, सूप, ज्यूस अशा द्रवरूप पदार्थावरच तीचे भोजन होत असे. सुमारे तीन वर्षे तिची अशाप्रकारची शरीरक्रिया चालली. दिवसातून तीन वेळा तीचे कपडे बदलावे लागत. कामाला जाताना घराला बाहेरून कुलुप लावून मला जावे लागत असे. **या काळात रोज अर्धा दिवस तिची जबाबदारी शिवबाबांवर सोपवून मी कामाला जात असे. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिवबाबा तिची खूप काळजी घेत. मी घरी येईपर्यंत ती घरात एकटी अगदी सुखरूप असे. अधून-मधून सेंटरच्या दीदीसुद्धा खास तिला भेटण्यासाठी येत असत. तिला दृष्टी देत असत.**

ड्रामानुसार २४ नोव्हेंबर २०११ रोजी माझ्या आईने देहाचा त्याग केला. मी आईची सेवा ज्या भावनेने व मोठ्या प्रेमाने केली होती; त्याची बातमी संपूर्ण गावभर पसरली. त्यामुळे गावातील प्रत्येक व्यक्ती आईच्या अंत-दर्शनासाठी आली व प्रत्येक जण हेच म्हणत होता की आई-वडिलांची सेवा करावी तर बापूभाई सारखी! पुढे महाराष्ट्र शाहिर परिषदेतर्फे मला 'श्रावणबाळ' हा पुरस्कार प्रदान करून, पन्हाळ गडावर माझा सन्मान करण्यात आला. खरोखर जीवन धन्य झाले. **याठिकाणी वाचकांना हेच नम्र निवेदन करावेसे वाटते की 'आपल्या आई-वडिलांची, त्यांच्या वृद्धापकाळात मोठ्या प्रेमाने सेवा करा. त्यांनी आपल्याला जन्म देऊन, लहानाचे मोठे केले; त्यांच्या ऋणातून काही अंशी तरी मुक्त होण्याचा प्रयत्न करा. त्यांच्या आशीर्वादात अपार सामर्थ्य दडलेले आहे, हे कधीही विसरू नका.'** (पंढरीचा पांडुरंग हा मातपित्यांची सेवा करणाऱ्या पुंडलिकाला दर्शन देण्यासाठी स्वयं आला होता. ही बोधप्रद कथा सदैव लक्षात ठेवा.)

त्यानंतर मी आईचे नाव देऊन 'हिराई दूध संस्था' स्थापन केली. त्या संस्थेचा मी चेअरमन आहे. गावातील सुमारे १०० ते १२५ लोकांनी माउंटआबूला जाऊन राज-योग शिबीर केले आहे. फलस्वरूप गावातील ग्रामपंचायतीने ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या गीता पाठशाळेसाठी, बांधकाम केलेली एक वास्तू दिली आहे. गावातील सर्वांना शिवबाबांचा संदेश देण्यात आला आहे. मी स्वतः शाहिर असल्याने, गावोगावी जाऊन ज्ञानावर आधारीत पोवाडे गातो व मोठ्या प्रेमाने सर्वांना ईश्वरी संदेश देत असतो. दुसरी विशेष गोष्ट म्हणजे संपूर्ण स्वस्थ व सुदृढ शरीरयष्टीचे वरदानच जणू काही शिवबाबांकडून मला प्राप्त झाले आहे. त्यामुळे सध्या माझे वय ५५ वर्षे असूनही, जीवनात सदा उत्साहाचा अनुभव करतो अर्थातच ही सगळी संगमयुगी पवित्र कुमार जीवनाची किमया आहे. यापुढेही आयुष्याचा प्रत्येक क्षण याद व सेवेत सफल व्हावा हीच शुभकामना आहे. ती शिवबाबा अवश्य पूर्ण करतील, ही खात्री आहे. शेवटी स्वरचित पोवाड्यातील दोन कडवी खाली नमूद करून, मी माझा लेखप्रपंच संपवतो.

आधी नमन परमपिता शिव परमात्म्याला, गीता मातेला।
सर्वांचे कल्याण तोच करणार,
स्वर्ग पुन्हा स्थापन येथे होणार,
त्रिलोकी झेंडा फडकणार, हो...जी.जी।। १।।
निराकार ज्योति स्वरूपाचा, शांतीचा दाता, प्रेमाचा साठा।
पतितांना तोचि पावन करणार,
सर्वांना गती-सद्गती देणार,
जगी तोचि अजरामर रहाणार..जी..जी।। २।।

---

## समस्त आत्मे, व्हावे देवता

**समस्त आत्मे व्हावे देवता आणि भूमी ही स्वर्गसमान।**
**स्वप्न शिवाचे पूर्ण करूया, करूनी नवयुग हे निर्माण।।धृ।।**
**दांभिक, द्वेषी आणि कपटी, भ्रष्टाचारी कोणी नसो।**
**सर्व असावे इथे सुखी अन् परोपकारी सर्व असो।**
**एकदिलाने वागू सारे, परस्परांना देऊ मान।**
**स्वप्न शिवाचे पूर्ण करूया, करूनी नवयुग हे निर्माण।।१।।**
**हिंदु, मुस्लिम, जैन, पारशी, भेदभाव हे दूर करू।**
**एकमेकां साह्य करूनी, सत्यत्वाचा मार्ग धरू।**
**परमपित्याचे वारस आम्ही, आहो सारे एक समान।**
**स्वप्न शिवाचे पूर्ण करूया, करूनी नवयुग हे निर्माण।।२।।**
**रोज प्रभाती बाबा देती, शिकवण आत्मोद्धाराची।**
**कर्तव्याची मिळे प्रेरणा, हाव नसे अधिकाराची।**
**शिवज्ञानाला धारण करिता, विश्व हेच होईल महान।**
**स्वप्न शिवाचे पूर्ण करूया, करूनी नवयुग हे निर्माण।।३।।**
***(संदर्भः ब्र. कु. गौतम सुत्रावे रचित ज्ञानसुधा ही शिवबाबांची)***